संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०७२ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

महिला दिवस

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. ०८ मार्च २०२६

तुझ्या उत्तुंग भरारीपुढे
गगनही ठेंगणे भासावे
तुझ्या विशाल पंखाखाली
विश्व सारे वसावे

**महिला दिनाच्या शुभेच्छा...!**

# नागपूरच्या विकासात एक्सएसआयओने महत्त्वाची भूमिका वठवावी

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : मुख्यमंत्र्यांच्या हस्ते महाराष्ट्रातील पहिल्या एक्सएसआयओ बुद्धिमत्ता एकीकृत प्रगत औद्योगिक व निर्मिती पार्कचे भूमिपूजन**

**नागपूर (दै. संध्या)**

■ प्रकल्पामुळे २५०० लोकांना रोजगारासह राज्यातील उद्योगाला नवी दिशा मिळणार



राज्यशासनाच्या उद्योग पूरक धोरणामुळे निर्मिती क्षेत्र सकारात्मक दिशेने वळण घेत आहे. उद्योगाला चालना देत विदर्भाच्या विकासासाठी नागपूरला उद्योगाचे मॅग्नेट बनविण्याच्या दिशेने पाऊल टाकले असून त्यात एक्सएसआयओ कंपनीने महत्त्वाची भूमिका वठवावी, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. नागपूर -अमरावती महामार्गावर स्थित लिंगा परिसरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्रातील पहिल्या एक्सएसआयओ बुद्धिमत्ता एकीकृत प्रगत औद्योगिक व निर्मिती पार्कचे भूमिपूजन झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त व नियोजन राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल, आमदार डॉ.आशिष देशमुख आणि आमदार चरणसिंह ठाकूर, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, एक्सएसआयओ इंडस्ट्रीयल अॅण्ड लॉजिस्टिक पार्क चे व्यवस्थापकीय संचालक आशिष अग्रवाल आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारतासारख्या लोकशाही देशाला ग्लोबल सप्लाय चेनमध्ये सशक्तपणे उभे करण्यासाठी निर्मिती क्षेत्र अधिक बळकट करणे गरजेचे आहे. यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत देशाला विकसित करण्याचे दिलेले उद्दिष्ट पूर्ण होऊ शकेल. महाराष्ट्र शासनानेही या दिशेने पुढे जाण्यासाठी उद्योगस्नेही धोरण आणले आहे. त्यामुळे राज्यात निर्मिती क्षेत्र नवे वळण घेत आहे त्यात सकारात्मक बदल घडत आहेत. निर्मिती क्षेत्राला ऑटोमेशन, एआय व अन्य तंत्रज्ञानाद्वारे गती मिळत आहे.

ग्लोबल कॅपिबिलिटी सेंटरमध्ये देशाला व महाराष्ट्राला पुढे घेऊन जाण्यासाठी व तिसऱ्या मोठ्या अर्थव्यवस्थेचे ध्येय देशासमोर ठेवले असताना हे साध्य करण्यासाठी एक्सएसआयओ सारख्या उद्योग समूहाची महत्वाची भूमिका ठरते, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना महाराष्ट्राची आर्थिक प्रगती राज्यासमोर मांडली. आर्थिक स्थितीत महाराष्ट्र हे जगात ३० व्या क्रमांकावर आहे. येत्या काळात देशातील पहिली ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने महाराष्ट्र प्रयत्नरत आहे. त्यासाठी शासनाने रोडमॅप तयार केला आहे यास प्रत्यक्षात आणण्यात आजच्या लॉजिस्टिक पार्कची महत्त्वाची भूमिका आहे.नागपूर उद्योगाचे मॅग्नेट बनवताना येक्स येस आयओ ने जोरकसपणे कार्य करावे, असेही त्यांनी सांगितले. एक्सएसआयओ ने नेक्स्ट जेन बाबतही देशात अन्य ठिकाणी लॉजिस्टिक पार्क उभारताना नागपुरलाही प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त करताना नागपूरला उद्योगाचे मॅग्नेट बनवताना या पार्कने महत्वाची भूमिका वठवावी असेही ते म्हणाले. 'एक्सएसआयओ इंडस्ट्रीयल अॅण्ड लॉजिस्टिक पार्क'चे व्यवस्थापकीय संचालक आशिष अग्रवाल यांचे स्वागतपर भाषण झाले.

तत्पूर्वी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'एक्सएसआयओ अॅडव्हान्सड् इंडस्ट्रीयल पार्क' परिसरात गेस्ट हाउसचे उद्‌घाटन व वृक्षारोपण केले.

महाराष्ट्रातील औद्योगिक पायाभूत सुविधांच्या दृष्टीने महत्वाचा असलेल्या या पार्कच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रात एक नवा अध्याय सुरू होणार आहे. ब्लॅकस्टोन समर्थित हे पार्क ७०० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीतून साकारले जात आहे. तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेले हे राज्यातील पहिलेच 'इंटेलिजन्स-इंटिग्रेटेड' औद्योगिक संकुल आहे. या प्रकल्पामुळे नागपूर आणि परिसरात सुमारे २,५०० प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत.

हे औद्योगिक संकुल केवळ कारखाना नसून 'स्मार्ट कॅम्पस' असेल. यात आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित बिल्डिंग मॅनेजमेंट सिस्टीम आणि 'डिजिटल ट्विन' तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे, ज्यामुळे ऊर्जेची बचत आणि कामाचा दर्जा सुधारण्यास मदत होते. एक्सएसआयओ मार्फत महाराष्ट्रात एकूण ८,१४२ कोटी रुपयांची गुंतवणूक केली जात असून त्याद्वारे राज्यात ३५,००० हून अधिक रोजगार निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे.

## मोदीजी, आपण शांततेसाठी पुढाकार घ्यावा, अण्णा हजारेंचं पंतप्रधानांना पत्र

**अहिल्यानगर (दै. संध्या)**

जगाचं लक्ष सध्या अमिरेका, इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाकडे लागले असून युद्धाविराम कधी होईल, याचीच वाट सर्वजण पाहात आहेत. या युद्धाचे परिणाम जागतिक पातळीवर होत असून हजारो नागरिक मृत्युमुखी पडले आहेत. भारतानेही युद्धसंदर्भाने भूमिका स्पष्ट करत युद्ध थांबवण्याची गरज व्यक्त केली आहे. तसेच, आखाती देशात अडकलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेसाठी संबंधित नेत्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी फोनवरुन संपर्कही केला होता. त्यातच, आता ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र लिहून युद्धजन्य परिस्थितीत



भारताने शांततेसाठी पुढाकार घेण्याची विनंती केली आहे. जगातील वेगवेगळ्या देशात वाढत असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने शांततेसाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून केली आहे.

## UPSC मध्ये ३०१व्या रँकवर २ उमेदवारांचा दावा

**मुंबई (दै. संध्या)**

■ यूपी आणि बिहारच्या 'आकांक्षा सिंह' यांचे समान रोल नंबर; QR स्कॅन केल्यावर उघड झाला गोंधळ

UPSC नागरी सेवा परीक्षा 2025 च्या निकालात एकाच रँकवर दोन उमेदवारांनी दावा केला आहे. UPSC ने जारी केलेल्या गुणवत्ता यादीत AIR 301 वर आकांक्षा सिंह आहेत, ज्यांचा रोल नंबर 0856794 आहे. या निवडीवर बिहार आणि यूपीमधून 2 वेगवेगळ्या विद्यार्थिनींनी दावा केला आहे. या दोन्ही उमेदवारांचे नाव आकांक्षा सिंह आहे. दिव्य मराठीने प्रकरणाची चौकशी करण्यासाठी दोन्ही उमेदवारांचे प्रवेशपत्र तपासले. यूपीच्या गाझीपूरच्या आकांक्षाच्या मुलाखतीच्या कॉल लेटरवर नोंदवलेला रोल नंबर 0856794 आहे.



या प्रवेशपत्रावर दिसणारा QR स्कॅन केल्यावरही तोच रोल नंबर दिसत आहे. तर, बिहारच्या आरा येथील आकांक्षा सिंहने दिव्य मराठीला आपले पूर्वपरीक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध करून दिले. मात्र, यावरही रोल नंबर 0856794 असाच लिहिलेला दिसत आहे. पण QR स्कॅन केल्यावर रोल नंबर 085659 दिसत आहे. अशा परिस्थितीत, एकतर UPSC कडून प्रवेशपत्र जारी करण्यात काहीतरी गडबड झाली आहे, किंवा बिहारच्या आकांक्षाच्या प्रवेशपत्रात छेडछाड करण्यात आली आहे. या प्रकरणी UPSC कडून अद्याप कोणतेही स्पष्टीकरण आलेले नाही. उत्तर प्रदेशातील गाझीपूरच्या रणजीत सिंह यांची मुलगी आकांक्षाने दिव्य मराठीला सांगितले की, तिने 0856794 रोल नंबरने ऑगस्ट 2025 मध्ये मेन्स आणि 4 फेब्रुवारी 2026 रोजी मुलाखत दिली होती. तिने सांगितले- मला स्पष्ट आहे की हा निकाल माझा आहे, तुम्ही माझ्या प्रवेशपत्रावरील कोड किंवा रोल नंबरवरून तपासू शकता. यूपीएससीच्या साइटवर कोणतीही शंका नाही. मीडियामध्ये चुकीची माहिती पसरली आहे. हा निकाल माझाच आहे हे संपूर्ण प्रकरण स्पष्ट झाले आहे. आरा येथील आकांक्षाला वाटत असेल की निकाल तिचा आहे, तर तिने समोर येऊन या गोष्टीचे खंडन करावे आणि पुराव्यासह दाखवावे. आरा येथील आकांक्षाने कोणत्या आधारावर निकाल पाहिला आहे, हे मला माहीत नाही. मी याच रोल नंबरने मुख्य परीक्षेसह तिन्ही परीक्षा दिल्या आहेत. माझे वडील मला प्रत्येक वेळी परीक्षा द्यायला घेऊन जातात. जेव्हा मी फॉर्म भरला होता, तेव्हा मला हा रोल नंबर मिळाला होता.

## वर्ल्डकप ट्रॉफीसाठी अब्जावधी लोकांची मने तोडणार : सँटनर

**मुंबई (दै. संध्या)**

■ भारतावर विजयाचा दबाव

टी-20 वर्ल्डकप 2026 च्या फायनलपूर्वी न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनर म्हणाला की, ट्रॉफी जिंकण्यासाठी जर अब्जावधी भारतीय चाहत्यांचे मन दुखावावे लागले तरी त्यांना हरकत नाही. घरच्या मैदानावर खेळल्यामुळे भारतावर विजेतेपद जिंकण्याचा दबाव जास्त असेल, असे त्यांनी मान्य केले. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर रविवारी होणाऱ्या फायनलपूर्वी सँटनर म्हणाला की, सामन्यात भारताच्या टॉप ऑर्डरच्या विकेट्स महत्त्वाच्या असतील. भारतीय संघ मजबूत आहे, पण योग्य वेळी सुरुवातीच्या विकेट्स घेतल्यास सामन्याचे चित्र बदलू शकते. न्यूझीलंडच्या कर्णधाराने सांगितले की,




संघ अंतिम सामन्यासाठी उत्सुक आहे आणि खेळाडूंमध्ये चांगले वातावरण आहे. त्यांच्या मते, वर्ल्ड कप फायनल हा एकच सामना असतो, त्यामुळे संघ पूर्ण तयारीने मैदानात उतरेल. सँटनरने सांगितले की, त्यांनी अजून खेळपट्टी पाहिली नाही, पण त्यांना आशा आहे की अहमदाबादमध्ये जास्त धावा होऊ शकतात. त्यांनी भारतीय वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहचेही कौतुक केले. बुमराहने या स्पर्धेत आतापर्यंत 10 विकेट घेतल्या आहेत आणि त्याचे यॉर्कर व बाउन्सर कोणत्याही फलंदाजासाठी आव्हान आहेत.

सँटनर म्हणाला की, न्यूझीलंडचा संघ संपूर्ण स्पर्धेत अनेकदा कठीण परिस्थितीतून गेला आहे आणि त्या अनुभवांमधून संघाने खूप काही शिकले आहे. त्याने असेही म्हटले की, वर्ल्ड कप फायनल द्विपक्षीय मालिकेपेक्षा वेगळी असते. त्याने स्पष्टपणे सांगितले की, जर संधी मिळाली तर न्यूझीलंड यजमान संघाच्या अपेक्षा मोडून ट्रॉफी जिंकण्यापासून मागे हटणार नाही.

भारताच्या आक्रमक फलंदाजीबद्दल सँटनर म्हणाला की, भारतीय संघ सुरुवातीपासूनच वेगाने धावा करतो आणि शेवटपर्यंत त्याच शैलीत खेळतो. अशा परिस्थितीत न्यूझीलंडसाठी सुरुवातीच्या विकेट्स घेणे खूप महत्त्वाचे असेल.

त्यांनी सांगितले की, फायनलचे महत्त्व त्याच्या जागी आहे, पण संघाचे लक्ष प्रत्येक सामन्यात असते तसेच राहील. त्यांच्या मते, खरा फरक मैदानावर योजना अधिक चांगल्या प्रकारे अंमलात आणल्याने पडेल.

## भारत ही जगातील वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था : अलेक्झांडर स्टब

**मुंबई (दै. संध्या)**

भारत आणि फिनलंड यांच्यातील दीपक्षीय संबंध दृढ आहे. या दौऱ्यामुळे हे संबंध अधिक दृढ होणार आहे. भारत हा जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. फिनलंडला शाश्वत विकासासाठी भारताचे सहकार्य आवश्यक असल्याची बाब फिनलंडचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर स्टब यांनी अधोरेखित केली. फिनलंडचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर स्टब भारताच्या दौऱ्यावर आहेत. हॉटेल ताज पॅलेस येथे भारत आणि फिनलंड येथील विविध कंपन्यांच्या प्रतिनिधीसोबत अध्यक्ष स्टब यांच्या संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी फिनलंडचे रोजगार मंत्री मॅटियास मार्टिनेन, नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे मुख्य कार्यकारी



अधिकारी आशिष चौहान, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे मुख्य गुंतवणूक अधिकारी डॉ. शंकर देशपांडे, फिनलंड परराष्ट्र मंत्रालयाचे राज्य सचिव जुका सोलोवारा, मुंबईतील फिनलंडचे कॉन्सिलेट जनरल एरिक अफ हॅलोस्ट्रॉम, सहाय्यक संजू नायर आदी उपस्थित होते.

## पुण्यातील बिबट्यांना वनतारात हलवलं; पहिल्या टप्प्यात २० बिबट गुजरातला रवाना

**पुणे (दै. संध्या)**

जिल्ह्यातील वाढती बिबट्यांची संख्या मनुष्यवस्तीसाठी जीवेघेणी ठरत असल्याचं चित्र गेल्या काही महिन्यात दिसून आलं. त्यामुळे, शासनापुढे पुणे जिल्ह्यातील बिबट्यांच्या वाढत्या संख्येचा आणि माणसांच्या सुरक्षिततेचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. त्याच अनुषंगाने पुण्यातील बिबट्यांना गुजरातमधील वनतारा येथे हलविण्याचा निर्णय घेण्यात आला. वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडून राज्य सरकार आणि वनतार यांच्यात करारही झाला होता. त्यानुसार, आता येथील 50 बिबट्यांना वनतारामध्ये हलविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यानुसार, जुन्नर तालुक्यातील माणिकडोह येथून 20 बिबटे गुजरातमधील वनतारा येथे हलविण्यात आले आहेत.

जिल्ह्याच्या जुन्नर वनविभागाच्या हद्दीत मानव-बिबट संघर्षाच्या घटनांमध्ये मागील काही वर्षांत मोठी वाढ झाल्याने पकडण्यात आलेल्या बिबट्यांचे स्थलांतर करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार आज (7 मार्च) रोजी पहिल्या टप्प्यात 20 बिबट्यांना गुजरातमधील वनतारा केंद्रात हलविण्यात आले. मानव-बिबट संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जुन्नर व शिरूर तालुक्यातील काही बिबट्यांना पकडून त्यांना माणिकडोह बिबट निवारा केंद्र येथे




ठेवण्यात आले होते. मात्र, या केंद्राची क्षमता 50 इतकी मर्यादित असल्याने अतिरिक्त बिबट्यांचे इतर योग्य ठिकाणी स्थलांतर करणे आवश्यक झाले होते. बिट्यांच्या स्थलांतरणासाठीचा प्रस्ताव Central Zoo Authority, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविण्यात आला होता. या प्रस्तावाला 20 डिसेंबर 2025 रोजी मंजुरी मिळाल्यानंतर पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यानुसार गुजरातमधील Greens Zoological Rescue and Rehabilitation Center (Vantara) येथील 25 सदस्यीय पथक पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. गौरव श्रीवास्तव यांच्या नेतृत्वाखाली 6 मार्च रोजी जुन्नर येथे दाखल झाले. आज पहिल्या टप्प्यात 10 नर आणि 10 मादी अशा एकूण 20 बिबट्यांना वातानुकूलित आणि सुसज्ज रेस्क्यू व्हॅनद्वारे सुरक्षितपणे वनतारा केंद्रात रवाना करण्यात आले. ही संपूर्ण प्रक्रिया वन्यजीव विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जुन्नर वनविभागातील अधिकारी-कर्मचारी तसेच वाइल्डलाइफ SOS संस्थेच्या सहकार्याने पार पडली. दरम्यान मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्यासाठी वनविभागाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत असून नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

## महिलेच्या डोक्यात दगड घालून केला खुन

पुणे (दै. संध्या) : वडकी येथील काची कंपनीच्या शेजारील मोकळ्या जागेत एका महिलेचा मृतदेह आढळून आला होता. शेजारीच रक्ताने माखलेला दगड मिळून आला. या महिलेची ओळख पटली नसतानाही गुन्हे शाखेच्या युनिट ६ च्या पथकाने महिलेचा खुन करणाऱ्याचा शोध घेऊन त्याला अटक केली आहे. फिरस्ता असलेली व मानसिक रुग्ण असलेल्या या महिलेने शारीरीक संबंधांना प्रतिकार केल्याने रागाच्या भरात हमाली काम करणाऱ्या तरुणाने तिच्या डोक्यात दगड घालून तिचा खुन केल्याचे निष्पन्न झाले आहे. प्रकाश बिभिषण माने (वय २९, रा. वडकी नाला, ता़ हवेली) असे खुन करणाऱ्या आरोपीचे नाव आहे.

## उत्तमनगर पोलिसांनी केली ५जणांना अटक

पुणे (दै. संध्या) : कोंढवे धावडे येथील पान टपरीवर रात्री थांबले असताना तरुणाने गाणे गुणगुणले. यावेळी आपल्या गर्लफ्रेंडकडे पाहून गाणे म्हटल्याचा गैरसमज करुन घेऊन टोळक्याने तरुणावर कोयत्याने डोक्यात, हातावर पायावर वार करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. उत्तमनगर पोलिसांनी ५ जणांना अटक केली आहे. करण गणपत वाशिलकर (वय २४), ओजी ऊर्फ रोहित गणेश मौर्य (वय २४), टुण टुण गण्या गणेश सिद्धराम कालदिप (वय २०), आदित्य गणेश पवार आणि बबलु शिवाजी कांबळे (वय २२, सर्व रा. उत्तमनगर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. या घटनेत प्रिन्स शैलेंद्र सिंग (वय २६, रा. भैरवनाथनगर,कोंढवे धावडे) यांनी उत्तमनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना कोंढवे धावडेमधील कोंढवा गेटजवळील मुस्कान पान शॉपजवळ ५ मार्च रोजी रात्री १० वाजता घडली.

## डिलिव्हरी बॉयने केला विनयभंग


पुणे (दै. संध्या) : पाणी मागण्याचा बहाणा करुन तरुणीचा हात पकडून "तुम्ही दिसायला खुप सुंदर आहात" असे म्हणून दुचाकीवरुन आलेल्या पोर्टर डिलिव्हरी बॉयने विनयभंग केला. शिवाजीनगर पोलिसांनी त्याला अटक केली आहे. श्रीधर हरीभाऊ कांबळे (वय २७, रा. शुक्रवार पेठ, मुळ रा. कराड) असे पोर्टर डिलिव्हरी बॉयचं नाव आहे. याबाबत एका ३० वर्षाच्या तरुणीने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना शिवाजीनगर गावठाणात शुक्रवारी ६ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रीधर कांबळे हा दुचाकीवरुन शिवाजीनगर गावठाण येथे आला होता. फिर्यादी यांना डिलिव्हरी दिल्यानंतर त्याने त्यांच्याकडे पिण्यासाठी पाणी मागितले. त्या पाणी देत असतानाच त्याने उजवा हात पकडून "तुम्ही दिसायला खूप सुंदर आहात," असे म्हणून त्यांच्या मनास लज्जा उत्पन्न होईल, असे वर्तन केले. त्यामुळे या तरुणीने आरडाओरडा केला. तेव्हा तो पळून गेला. या तरुणीने शिवाजीनगर पोलिसांकडे तक्रार केली. पोलिसांनी त्याचा मोबाईल नंबर ट्रेस करुन त्याला अटक केली.

## संपादकीय

# अमृता शेरगीलच्या या 'तीन मुलीं'ना कसली चिंता सतावत असेल?

भिंतीला टेकून बसलेल्या तीन मुली. भविष्यात जे काही वाढून ठेवलं आहे ते स्वीकारण्याची वाट पाहात बसलेल्या. कपड्यांच्या लाल, हिरव्या, केशरी आकर्षक छटांशी पूर्ण विसंगत चेहऱ्यावरील चिंतेच्या काळसर छटा. भिंतींवर रेंगाळत्या सावल्याशी मेळ घेणाऱ्या. गोलसर, तारुण्याचा गोडवा असलेले चेहरे, मोहक सौष्ठव या कशाहीपेक्षा त्यांच्या चेहऱ्यावरील म्लान, उदास, परिस्थितीशरण मौन भाव सर्वात जास्त लक्ष वेधून घेणारा आहे. वयाला साजेसा आनंद, उत्फुल्लतेची एकही छटा तिघींच्या आविर्भावात नाही. अनामिक दडपण चेहऱ्यावर स्पष्ट उमटलं आहे. नेमकी कसली चिंता सतावत असेल या तीनही मुलींना? वैवाहिक आयुष्यही अजून सुरू झालेलं नाही. कदाचित द्यावा लागणारा हुंडा, सुटलेली शाळा, चेहराही न बघितलेला आयुष्यभराचा जोडीदार, अनोळखी सासर, भविष्याची अनिश्चितता..?

थ्री गर्ल्स हे अमृता शेरगीलने १९३४ साली युरोपातून कला शिक्षण घेऊन भारतात परतल्यावर रंगवलेलं पहिलं चित्र. कलेचं तंत्र आधुनिक, जगण्याची शैली पाश्चात्य असली तरी तिच्या चित्रांचा आत्मा पूर्णपणे भारतीय होता. रंग स्थानिक मातीचे. असं असूनही अमृता शेरगीलमुळेच भारतीय चित्रकलेतील परंपरा, पावित्र्याच्या कल्पनेत जखडलेल्या स्त्रीची सांकेतिक प्रतिमा मुक्त होऊ शकली. अमृता स्वतंत्र विचारांची, धाडसी, स्त्रीवादी विचारसरणीची चित्रकार होती. नग्नता, लैंगिकतेचा मुक्त उच्चार तिच्या चित्रभाषेत होता. अजून स्वतंत्र, मुक्त न झालेल्या भारतात तिने उन्मुक्तपणे चित्रं रंगवली. भारतीय ग्रामीण स्त्रियांच्या आयुष्यातले खरे रंग तिच्या चित्रांमध्ये उमटले. पॅरिसहून परतल्यावर भारतीय लोकजीवनाला



अमृताने कॅनव्हास बनवलं. उबदार ज्वालाफुलांच्या लाल-केशरी अम्लान हिरव्या छटांमध्ये लपेटलेल्या सामान्य स्त्रियांच्या समूहांनी भरलेले ते कॅनव्हास. सण-समारंभात मग्न असलेल्या तरुण स्त्रिया किंवा एकाकी अबोल मुली. झुल्यावर बसणाऱ्या, सहेलीच्या लग्नात तिचा साजशृंगार करणाऱ्या किंवा लाल व्हरांड्यात चारपाईवर फुलकारीची चादर अंथरून गप्पा करणाऱ्या. एखादी एकटी केशरी पडद्याआड संकोचाने नहात असलेली. एखादी नखशिखांत जर्द गुलाबी नवी नवरी.. अंगावरच्या पेहेरावातील झळाळत्या रंगछटांच्या आड आपल्या चेहऱ्यावरची उदासी, अस्वस्थ मौन दडवू पहाणाऱ्या स्त्रिया आणि मुली. त्यांची दबलेली लैंगिकता आणि एक अनामिक घुसमट त्या गडद रंगसंगतीच्या थरांआड कुठेतरी लपून आहे. समवयस्कांसोबत असतानाही आपापल्या वाट्याचं दुःख एकेकट्यानी, मुकाट भोगणाऱ्या. अमृताच्या चित्रांत स्त्री केवळ 'सुंदर वस्तू' नाही. ती विचार करणारी आहे. कधी एकटी, कधी अंतर्मुख, कधी थकलेली. अमृताला सामान्य भारतीय स्त्रियांची दैवाधीन विवशतेची आंतरिक सहसंवेदना जाणवली होती. चित्रकार जेव्हा स्त्री असते तेव्हा आपल्या भोवतालच्या स्त्रियांकडे पाहण्याचा तिचा दृष्टिकोन किती वास्तववादी आणि सहानुभावाचा असतो याचा प्रत्यय अमृताच्या चित्रांमधून येतो. शिमला आर्ट अकॅडमीने 'उत्कृष्ट स्त्री-चित्रकार' म्हणून केलेला गौरव 'मी चित्रकार आहे त्याचा गौरव करा, स्त्री म्हणून नको', असं सांगून नाकारणारी अमृता. तिच्या चित्रांचं पहिलं प्रदर्शन शिमल्याला होतं. त्याकरता शेवटचं एक चित्र रंगवण्यात ती मग्न होती, पण ते पूर्ण व्हायच्या आतच, वयाच्या केवळ २८व्या वर्षी अमृता हे जग सोडून गेली. केवळ सात वर्षांची चित्रकला कारकीर्द पदरात पडलेल्या अमृता शेरगीलच्या कला कर्तृत्वाला आजही तुलना नाही.

## गुरु वचन

### दुसऱ्याच्या दु:खात सहभागी होणे हीच इश्वर सेवा

वाणी, तन, मन, वचन आणि धन जी कोणतीही शक्ती आपल्याजवळ असो. तिच्याद्वारे आपण कुणाचे दु:ख तीळमात्रही कमी केले किंवा त्याच्या दु:खात आपण सहभागी झालो तर ही सर्वात मोठी इश्वर सेवा होय. मानवाच्या प्रवृत्तीत स्वाभाविकरित्या आपल्या सुख–सुविधा पाहण्याचा स्वार्थ निर्माण होतो. उपदेश देणाराही प्रकारान्तर आपल्याला समोर ठेवतो आणि म्हणतो तुम्ही भक्तांचा सन्मान करा. परमेश्वरही आपल्या भक्तांचा सन्मान करतो. व्यक्ती अर्थात आपण भक्त आहोत आणि तुम्ही आमचा सन्मान करा. आपली चर्चा करण्याची पद्धत वेगवेगळी असते. म्हणतात की, ज्ञानप्राप्तीनंतर काहीही करायला नाही पाहिजे. शेवटी तुम्ही समजलात आपण काहीही करु शकत नाहीत तर आपल्या परमेश्वराचे प्रेम मिळाल्यावर कोणी त्याचा निषेध करत नाही तर तुम्ही समजून घ्या की, आपण प्रेमी आहोत. परमेश्वराचे प्रेमी आहोत. हे छळाचे जीवन आहे आणि छळपूर्ण जीवनात दुसऱ्यांचा छळ करणे गुन्हा आहे. निर्णय परमेश्वरच घेतो. परंतु एवढा विश्वासू मात्र आवश्यक आहे की तो प्रेमळ आहे. आपल्याला गुन्ह्याला कमी समजणे हे त्याचे प्रेम आहे. परंतु आपण त्याच्या प्रेमाचा दुरुपयोग करायला नाही पाहिजे. त्याच्या प्रेमावरुन आपण स्वत:ला जनतेसमोर अशाप्रकारे सादर करा की, ते भ्रमात येतील हे स्वत:ला भ्रमात ठेवण्यासारखे आहे. ही गोष्ट मनुष्याने सदैव लक्षात ठेवली पाहिजे की, त्याला आपले भले करायचे असेल तर कुणाचयाही ऐकण्या–बोलण्याने वा कोणत्याही प्रकारच्या वाक्य संयोगाने स्वत:ला जिंकणे आहे. यापेक्षा अधिक ऐकले नाही तर मोठा धोका ठरेल. त्याच्या प्रगतीचे सर्व मार्ग खुंटले जातील आणि कष्ट करण्याची वेळ येऊ लागेल.

## उपदेशकथा

### चित्रकाराचा सन्मान

भोजराजाच्या आश्रयाला अनेक नाट्य कलाकार, संगीततज्ज्ञ, शिल्पकार, चित्रकार येत असतात. तो त्यांचा यथोचित आदर करी नि भरपूर धन देऊन सन्मानाने परत पाठवी. चित्रकार शिवशर्मा एकदा शेषनागाने एक अप्रतिम चित्र तयार केले. नंतर स्वत: ते चित्र राजदरबारात आणून राजाला भेट म्हणून त्याने अर्पण केले. 'वा! फारच छान आहे चित्र आहे हे आपले.' राजा कौतुकाने म्हणाला व आपल्या पद्धतीप्रमाणे दहा हजार मोहोरांची देणगीही जाहीर केली. पण शिवशर्मा केवळ चित्रकारच नव्हता. तो उत्तम कवीसुद्धा होता. चटकन तो बोलून गेला, 'महाराज, बेडकांना भक्षण करणारे नाग जागोजागी दिसतात. पण पृथ्वीचा भार सोसणारा एक शेषनागच बरं.' शेषनागाच्या उदाहरणातून सर्वांना आश्रय देणाऱ्या भोजराजाची त्याने केलेली ती स्तुती आणि त्याचबरोबर गोरगरीबांना पिळणाऱ्यांची केलेली निंदा चतुर राजाच्या लक्षात आल्यावाचून कशी राहील? संतुष्ट होऊन आणखी पंचवीस हजार मोहोरा त्याने शिवशर्माला दिल्या. राजदरबारातल्या इतर काही चित्रकारांना ही गोष्ट अर्थातच रुचली नाही. त्यांना त्यांच्या चित्रांबद्दल एवढे मोठे बक्षीस कदापि मिळाले नव्हते. राजाला त्यांच्या चेहऱ्याची नाराजी चटकन समजली व तो म्हणाला, 'मित्रांनो, चित्रकला नि काव्यकला यांचा अजोड संगम झालाय शिवशर्मात. दुग्धशर्करायोग. मणिकांचन योग म्हणतात तो यालाच बरे!' इतर चित्रकारांनीही मग शिवशर्माचा मोठेपणा मान्य केला आणि भोजनाच्या दरबारात आणखी एक नवरत्नाची भर पडली.

कथा उपदेश : अंगात गुण असले की कधी कधी तरी त्याचे चीज होते.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:तैतिल २१:११:१९ |
| ८ मार्च २०२६ | सूर्य:कुम्भ |
| रविवार | चन्द्र:तुला |
| विक्रम संवत्– २०८२ | हिजरी सन् – १४४६ |
| फाल्गुन शके | मुस्लिम मास – रमजान |
| संवत्– १९४७ | तारीख – १८ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | विशेष |
| अयन– उत्तरायणारंभ | कनिफनाथ यात्रा – मढी |
| मास– फाल्गुन | (अहिल्यानगर), |
| ऋतु– सौर वसंत | मोशी (हवेली) |
| कृष्ण पक्ष | सैलानीबाबा |
| तिथि:पंचमी २१:११:१९ | पालखी – पिपळगांव |
| नक्षत्र:स्वाती १३:३१:२३ | सराई (बुलढाणा) |
| योग:ध्रुव ०७:०३:२१ | जागतिक महिला |
| करण:कौलव ०८:११:०४ | दिन रंगपंचमी |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८८०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 3 | | | 9 | | 8 | 2 | |
| 1 | | | | | | | 5 | 9 |
| | 5 | | 3 | | | | 7 | |
| | 1 | | 2 | | 6 | | | |
| 4 | | | 9 | 5 | 3 | | | 8 |
| | | | 4 | | 7 | | 3 | |
| | 4 | | | | 2 | | 8 | |
| 3 | 7 | | | | | | | 5 |
| | 9 | 8 | | 7 | | | 6 | 3 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ८७९ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 3 | 4 | 9 | 8 | 5 | 1 | 7 | 6 |
| 7 | 5 | 1 | 2 | 3 | 6 | 8 | 4 | 9 |
| 9 | 8 | 6 | 1 | 7 | 4 | 5 | 3 | 2 |
| 8 | 2 | 7 | 4 | 5 | 9 | 3 | 6 | 1 |
| 3 | 4 | 5 | 6 | 1 | 7 | 2 | 9 | 8 |
| 6 | 1 | 9 | 3 | 2 | 8 | 7 | 5 | 4 |
| 5 | 9 | 2 | 8 | 4 | 3 | 6 | 1 | 7 |
| 1 | 6 | 3 | 7 | 9 | 2 | 4 | 8 | 5 |
| 4 | 7 | 8 | 5 | 6 | 1 | 9 | 2 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६१८ – योहान्स केप्लरने ग्रहभ्रमणाचा तिसरा नियम शोधला.
- १७०२ – ॲन स्टुआर्ट ईंग्लंडच्या राणीपदी.
- १७८२ – ग्नाडेहुटेनची कत्तल – ओहायोत ग्नाडेहुटेन येथे पेनसिल्व्हेनियाच्या नागरी दलाने १०० स्थानिक अमेरिकन व्यक्तिंचे डोके फोडून हत्या केली.
- १८४४ – ऑस्कार पहिला नॉर्वे व स्वीडनच्या राजेपदी.
- १९०६ – अमेरिकेच्या सैन्याने फिलिपाईन्समध्ये लपुन बसलेल्या ६०० व्यक्तिंची कत्तल केली.

### राष्ट्रीय

- १९३० – महात्मा गांधी यांनी भारतात सविनय कायदेभंग चळवळ सुरु केली.
- २००८ – मोरेलिया–लिनारेस बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेवर विश्वविजेत्या विश्वनाथन आनंद याने सलग दुसऱ्या वर्षी वर्चस्व कायम राखले.

### जन्म

- १५१४ – आमागो हारुहिसा, जपानी सामुराइ यांचा जन्म.
- १५४५ – यी सुन सिन, कोरियन दर्यासारंग यांचा जन्म.
- १७२६ – रिचर्ड होव, इंग्लिश दर्यासारंग यांचा जन्म.
- १८४१ – ऑलिव्हर वेन्डेल होम्स, अमेरिकन न्यायाधीश यांचा जन्म.
- १९३७ – जुवेनाल हब्यारिमाना, ऱ्वान्डाचा राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.

### निधन

- ११४४ – पोप सेलेस्टीन दुसरा यांचे निधन.
- १२०२ – स्वेर, नॉर्वेचा राजा यांचे निधन.
- १७०२ – विल्यम तिसरा, इंग्लंडचे राजा यांचे निधन.
- १८४४ – चार्ल्स चौदावा, स्वीडनचे राजा यांचे निधन.
- १८७४ – मिलार्ड फिलमोर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष यांचे निधन.

## : SMS :

Girl on Valentine Day in Card Shop.
Owner: yes madam
Girl: 1 card jispar likha ho mai sirf tumse pyr karti hu, kya hai aapke paas?
Owner: Ha he
Girl: 12 Dedo..

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३३.५ | २२.६ |
| अहमदनगर | ३२.२ | २१.१ |
| अकोला | ३५.७ | २३ |
| अमरावती | ३५.६ | २२.९ |
| बीड | ३६.९ | २२.२ |
| भंडारा | ३५.६ | २१.४ |
| बुलढाणा | ३३ | १६.१ |
| चंद्रपूर | ३६.९ | २२.१ |
| चेन्नई | ३७.५ | २१.१ |
| नवी दिल्ली | ३३.१ | १८ |
| धुळे | ३३.५ | २२.७ |
| गोंदिया | ३४.३ | २०.१ |
| जळगाव | ३६.२ | २२.३ |
| कोल्हापूर | ३३.६ | २०.५ |
| लातूर | ३३.६ | २०.६ |
| मुंबई | ३५.३ | २६.३ |
| नागपूर | ३५.४ | २१.३ |
| नांदेड | ३५.८ | २१.७ |
| नंदूरबार | ३२.१ | २२.६ |
| नाशिक | ३३.२ | २०.३ |
| पुणे | ३२.३ | २०.८ |
| पंढरपूर | ३४.१ | २१.५ |
| सातारा | ३४ | १९.६ |
| सांगली | ३४.१ | २०.६ |
| सोलापूर | ३४.७ | २३.६ |
| वर्धा | ३६.९ | २२.६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** नवीन जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील. प्रसिद्धीच्या झोतात राहता येईल. जवळचे प्रवास टाळावे.

**तुळ :** समोर आलेल्या संधीचा फायदा घ्या. आपली सामाजिक प्रतिष्ठा उंचावणाऱ्या घटना घडतील.

**वृषभ :** धार्मिक स्थळांना भेटी द्याल. थोरामोठयांच्या आशिर्वादाने, सहकार्याने आपली रेंगाळलेली कामे मार्गी लावता येतील.

**वृश्चिक :** महत्वाचे निर्णय यशस्वी करुन दाखवाल. नव्या जोमाने कामाला लागाल. संततीच्या उत्कर्षाची वार्ताकानी येईल.

**मिथुन :** नवीन जबाबदाऱ्या स्वीकाराल. आपले कार्यक्षेत्र विस्तृत करण्याचा प्रयत्न कराल. महत्वाचे कागदोपत्रीचे व्यवहार मनाजोगे होतील. मनस्वास्थ लाभेल.

**धनु :** उपासना मार्गातील लोकांना चांगली अनुभूती मिळेल. आशावादी धोरण स्वीकाराल. जनसंपर्कातून सतत लाभ होतील.

**कर्क :** न्याय प्रविष्ठ प्रकरणातून लाभ होतील. एखाद्या संघटनेच्या नेतृत्वाची जबाबदारी स्विकाराल. कार्यकौशल्यामुळे कार्यक्षेत्रातून आपली प्रशंसा केली जाईल.

**मकर :** कामातील आत्मविश्वास व मनोबल उत्तम राहील. व्यावसायिक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून आधुनिक उपक्रम राबविता येतील.


**सिंह :** इच्छा, आकांक्षा कृतीत आल्यामुळे समाधान लाभेल. पत्नीचा सल्ला महत्त्वाचा ठरेल. व्यावसायिकांनी मात्र सतर्कतेने निर्णय घेणो गरजेचे आहे.

**कुंभ :** आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर असामान्य शक्तीची साथ मिळेल. आणि त्याच जोरावर आपले वाजवी ध्येय साध्य करु शकाल.

**कन्या :** थोरा – मोठयांच्या सहकार्याने आपली रेंगाळलेली कामे मार्गी लागतील. कुणीतरी तुम्हाला आव्हान देण्याचा प्रयत्न करेल.

**मीन :** मन सैरभैर होईल. अचानक धनप्राप्ती होईल. वारसाहक्काने धनप्राप्ती होण्याचे योग आहे. आपल्याला चांगला मार्गदर्शक भेटेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८८०



### आडवे शब्द

१. निकट
४. हत्तीचे तोंड असलेला याअर्थी गणपतीचे नाव
८. पातक
१०. राजा हरिश्चनचंद्राची पत्नी
१२. नवरा
१३. मनाला आलेला थकवा
१५. संतोष
१७. नंतर
१८. अंधार
१९. 'पॉवरलूम'ला मराठी शब्द
२१. नूतन, जुनाच्या विरुद्ध
२२. चांगले वर्तन
२३. सवय, राबता
२४. गाव, नगर
२५. प्रजा
२८. सगळीकडे
२९. प्रयत्न
३१. मागे सरणे, माघार घेणे
३३. फार उष्ण वा थंड नसलेले
३५. माहीत असलेले
३६. मंदिराच्या शिखराचे टोक
३७. मादीच्या विरुद्ध
३८. हटकून
३९. चौक
४०. गाणे
४२. हाताचा प्रहार, मार
४३. स्वच्छ, चकचकीत
४८. सर्वात खालचे पाताळ
५०. एक श्वासरोग
५२. लोक
५३. विपुल प्रमाणात आढळणारा जलचर
५५. अस्थिर संपत्ती
५६. श्रीविष्णूचे नाव
५७. थोरवी
५८. खून
६०. साप, मुंगी यांचे घर
६१. पोते
६३. मेंढपाळ
६५. लागून, जवळ
६७. मधुमक्षिका
७०. रेती
७१. सुस्ती, कंटाळा
७३. थोर, मोठा
७५. संपणे
७६. वयाने थोराड नवरदेव
७९. मनाला टोचणारे दु:ख
८०. मुलाची मुलगी
८१. क्वचित
८२. रांग
८३. उच्च–नीच नसणे

### उभे शब्द

१. समाजातील मतप्रवाह
२. अत्यंत कपटी
३. सरळ, लांब बांबू
४. वेग, ५. वार्तापत्र
६. डोळे
७. ऐटबाज
९. बाज, खाट
११. अधिक महिना
१४. रम्य
१६. संकटकाळी देवाला बोलावणे
१७. असह्य वेदना
२०. हरवलेले सापडणे
२२. च्या बरोबर
२४. लाज
२५. धोबी
२६. तमाशातील कलावंत
२७. जाळणे
२९. बुद्धी
३०. जप्ती
३२. शेंगेवरचे आवरण
३३. नाजूक
३४. पत्र
३८. ठेकेदार
३९अ. हिंदीत उद्योग, प्रताप
४१. अगदी त्याप्रमाणे
४४. समाचार
४५. राग, चीड
४६. सर्वस्व
४७. आईचा भाऊ
४९. समशेर
५१. चंगळ, विपुलता
५४. दक्ष, ५६. वेदनेने ओरडणे
५९. श्रीमंत, ६२. किंमत
६४. बेंड
६६. पक्ष्यांचा राजा
६८. हवेतील थंडावा, गारवा
६९. समोरासमोरची झुंज
७१. दर्पण
७२. बेकरीतील एक पदार्थ
७४. हस्त
७५. पावसाची झड
७६. घोटाळा
७७. धंद्यातील फायदा
७८. ढीग
७९. वर्ष, साल

### जम्बो शब्दकोडे क्र. ८७९ चे उत्तर

आडवे उत्तर : १.अमर जवान ६.निकाल ९.सागरतट १२.जानवर १४.वराह १५.वासरू १६.मुरमाड १८.रमावर २०.नासका २१.माणूस २३.पाईक २५.नाथ २६.दर्या २७.कमाल किमान २९.पाय ३०.रम ३२.साय ३३.वासर ३४.मकरंद ३६.तनमनधन ३७.गो ३८.अधोवदन ४०.रतन ४२.वामनावतार ४६.तर ४७.माय ४८.वरवर ४९.खारट ५०.रणरण ५२.गतकाल ५४.रण ५५.रमा ५७.नविन ६०.सटवाई ६२.तरू ६३.सन ६५.शेवट ६७.परवा ६९.दरारा ७०.षटकार ७२.खलबत्ता ७४.खराब ७६.मगर ७७.तरतरी ८०.कर ८१.मणी ८२.खडकाळ

उभे उत्तर : १.अजागळ २.मन ३.रवळनाथ ४.जर ५.नगर ६.निवडणूक ७.कारा ८.लहर १०.गवार ११.रस १२.तरूणाई १६.मुकादम १७.मामा १९.वरमाय २२.समाधान २४.कदरदान २५.नायक २८.किसान २९.पामर ३०.रद ३१.जनन मरण ३३.वातावरण ३५.रंगीत ३९.धोतर ४०.रयत ४१.नवलविशेष ४२.वावर ४३.वखार ४४.तार ४५.रटरट ४७.मागमूस ५१.रडतराऊत ५३.कान ५६.मावा ५८.नवटाक ५९.टप ६०.सवाल ६१.ईद ६४.नखरा ६६.टका ६८.रखरख ७१.रमणी ७३.बरका ७४.खर ७५.बक ७८.रम्य ७९.रीत

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# सहकार क्षेत्रासाठी सकारात्मक संधी निर्माण करणारा अर्थसंकल्प : विद्याधर अनास्कर

**पुणे (दै. संध्या) :**

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी सादर केलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पात राज्याच्या आर्थिक विकासाला गती देणे, पायाभूत सुविधांचा विस्तार करणे, कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करणे आणि सामाजिक क्षेत्रातील गुंतवणूक वाढविणे या चार प्रमुख उद्दिष्टांचा समावेश असल्याने यंदाचा अर्थसंकल्प हा योग्य ती अंमलबजावणी झाल्यास राज्याला गतीमान विकासाकडे नेणारा ठरेल असा विश्वास दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप.बँक लि. चे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केला. श्री. अनास्कर म्हणाले, महाराष्ट्राच्या आर्थिक रचनेत सहकार क्षेत्राचे विशेष स्थान आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न दिसत असल्याने कृषी प्रक्रिया, ग्रामीण वित्तीय सेवा आणि लघू उद्योगांना चालना देण्यासाठी सहकारी संस्थांचा विशेष उपयोग होऊ शकतो. योग्य ते धोरणात्मक पाठबळ मिळाल्यास राज्याचे सहकार क्षेत्र ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देऊ शकते, यामुळे सहकार क्षेत्रासाठी ही संधी उपलब्ध होऊ शकते. अर्थसंकल्पात कृषी प्रक्रिया उद्योग, शीत गृहे व्यवस्था, साठवणूक व मूल्यवर्धन यावर भर देण्यात आला आहे. या क्षेत्रामध्ये सहकारी संस्थांची भूमिका अत्यंत महत्वाची ठरु शकते. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाचे प्रक्रिया, उद्योग, निर्यात व विपणन यामध्ये सहकारी संस्थांद्वारे अधिक संघटित व्यवस्था उभारता येऊ शकेल. नागरी सहकारी बँका, राज्य बँक व जिल्हा सहकारी बँका या ग्रामीण व लघू उद्योग क्षेत्रासाठी वित्त पुरवठा करणाऱ्या महत्वाच्या संस्था आहेत. एम.एस.एम.ई. स्टार्टअपस् कृषी प्रक्रिया यांना कर्ज पुरवठा करण्यामध्ये सहकारी बँकांनी अधिक सक्रिय भूमिका घेण्याची संधी आहे. योग्य नियामकता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास सहकारी बँका आर्थिक समावेशनात मोठे योगदान देऊ शकतात. अर्थसंकल्पातील ग्रामीण उद्योग विकासाच्या योजनांमुळे सहकारी संस्थांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊ शकते. थोडक्यात अर्थसंकल्पात ग्रामीण विकास, कृषी प्रक्रिया आणि उद्योग विकासावर दिलेला भर सहकार क्षेत्रासाठी सकारात्मक संधी निर्माण करणारा आहे. राज्यातील सहकारी संस्था जर योग्य व पारदर्शी व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञान यांचा स्वीकार करतील तर राज्याच्या आर्थिक विकासात सहकार क्षेत्राची भूमिका प्रभावी ठरु शकते, असेही श्री. अनास्कर म्हणाले.



## थोडक्यात पण महत्वाचे...



### पारंपरिक मिरवणुकीद्वारे पूर्व भागात शिवरायांना नमन

■ गुरुवार पेठेत प्रभात मित्र मंडळतर्फे शिवजयंती उत्सव; वेत्र चर्म, लाठी काठी प्रात्यक्षिके, ढोल ताशा वादन व महिलांच्या हस्ते शिवआरती

पुणे (दैनिक संध्या) : छत्रपती शिवाजी महाराजांची रथावर विराजमान झालेली सिंहासनाधिष्ठीत मूर्ती... ढोल-ताशांचा गजर व शंख निनाद आणि मर्दानी खेळांचे सादरीकरण... रांगोळीच्या पायघड्या व फुलांची उधळण...पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिला... अशा शिवमय झालेल्या वातावरणात शहराच्या पूर्व भागातील सर्वात मोठा शिवजयंती सोहळा उत्साहात पार पडला. गुरुवार पेठेतील प्रभात मित्र मंडळातर्फे आयोजित शिवजयंती उत्सवात पुणेकर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी अखिल भारतीय संत समिती, महाराष्ट्रचे महामंत्री स्वामी श्री भारतानंद सरस्वती महाराज, बहिर्जी नाईक यांचे वंशज आबासाहेब दादाराम जाधव -नाईक, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, भविष्य निर्वाह निधी, भारत सरकार आयुक्त अमित वसिष्ठ, नगरसेवक स्नेहल माळवदे, ऐश्वर्या थोरात यांसह मंडळाचे अध्यक्ष किशोर चव्हाण, उत्सव प्रमुख नितीन घोगरे, अमोल व्यवहारे यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

### उत्कर्ष बुक सर्व्हिसच्या वतीने विविध विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शन

पुणे (दैनिक संध्या) : पुणे आणि आजूबाजूच्या परिसरातील वाचनप्रेमींसाठी एक आनंदाची बातमी आहे. उत्कृष्ट बुक सर्विसतर्फे विविध प्रकारच्या पुस्तकांचे प्रदर्शन सुरु करण्यात आले आहे.या प्रदर्शनामध्ये जुनी आणि नवीन अशा दोन्ही प्रकारची पुस्तके उपलब्ध असून मराठी, इंग्रजी,धार्मिक,इतिहास आणि विविध विषयांवरील पुस्तके वाचकांसाठी उपलब्ध करण्यात आली आहेत.अशी माहिती प्रकाशनाचे प्रमुख सुधाकर जोशी यांनी सांगितली. डेक्कन जिमखान्यावरील दुकानामध्ये प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून ते सर्वांसाठी उपलब्ध असणार आहे. प्रदर्शनामध्ये पुस्तकांची आकर्षक पद्धतीने विषयावर वर्गीकरण करून मांडणी करण्यात आली आहे.त्यामुळे वाचकांना आवडीची पुस्तके सहजपणे शोधता येत आहेत. ज्ञानवृद्धी, अभ्यास आणि वाचनाची आवड जपणाऱ्यांसाठी प्रदर्शन एक उत्तम संधी आहे. प्रदर्शन आयोजकांनी वाचनप्रेमींना या प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन केले आहे. "पुस्तकप्रेमींनी एकदा तरी येऊन हे प्रदर्शन पाहावे आणि विविध विषयांवरील पुस्तकांचा आनंद घ्यावा,असे आयोजक जोशी यांनी सांगितले. प्रदर्शनामुळे वाचनसंस्कृतीला चालना मिळेल. पुस्तकप्रेमींनी या संधीचा फायदा घ्यावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

## महाराष्ट्राची अर्थ आणि राजकीय व्यवस्था साखरेभोवती संघटित

■ माजी प्रशासकीय अधिकारी अविनाश धर्माधिकारी

■ डॉ. अनिल गांधी लिखित 'साखर गोड पण जीवघेणी' या पुस्तकाचे प्रकाशन

**पुणे (दै. संध्या) :**

महाराष्ट्राचे ८० टक्के पाणी ऊस या एका पिकाला जाते. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचे टँकर देखील सर्वाधिक महाराष्ट्रातच लागतात. त्यातही पुणे जिल्ह्यात टँकरची सर्वाधिक मागणी असते. पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचा प्रश्न देखील महाराष्ट्रातच आहे. महाराष्ट्राची अर्थ आणि राजकीय व्यवस्था साखरेभोवती संघटित आहे. सर्वाधिक सिंचन प्रकल्प पुणे जिल्ह्यात आहेत. ऊस या एका पिकाभोवती अर्थव्यवस्था उभी राहिली आहे. आणि या गोष्टी इतक्या गुंतलेल्या आहेत की, एक साखर कारखाना म्हणजे दोन आमदार अशी परिस्थिती आहे, असे मत माजी प्रशासकीय अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केले. सर्जन डॉ. अनिल गांधी लिखित 'साखर गोड पण जीवघेणी' या आरोग्य विषयक पुस्तकाचे प्रकाशन टिळक रस्त्यावरील मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभागृहात झाले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार आणि आयुर्वेद तज्ज्ञ डॉ. शैलेश गुजर, लेखक सर्जन डॉ. अनिल गांधी, पुस्तकाच्या संपादिका डॉ. हेमलता पिसाळ, सॅम पब्लिकेशन कोल्हापूर चे अनिल मेहता, उपस्थित होते. अविनाश धर्माधिकारी म्हणाले, जीडीपी मोजताना माणूस आनंदी झाला का, हे मोजले पाहिजे. ग्रंथव्यवहार हा समाजाच्या प्रगल्भतेचे मूळ लक्षण आहे. जीडीपी महत्त्वाचा आहेच; परंतु बौद्धिकदृष्ट्या आणि वैचारिकदृष्ट्या समाज किती श्रीमंत आणि आरोग्य पुर्ण आहे, हे महत्त्वाचे आहे.

## सामाजिक समतेसाठी सरकारचे पाऊल स्वागतार्ह : डॉ. हुलगेश चलवादी

*बहुजनांवरील अत्याचार रोखण्यासाठी नियमांची काटेकोर अंमलबजावणी आवश्यक*

**पुणे (दै. संध्या) :**

सामाजिक समतेसाठी राज्य सरकारने उचललेले पाऊल स्वागतार्ह आहे. मात्र, बहुजनांवरील अत्याचार रोखण्यासाठी कठोर नियमांची अंमलबजावणी अत्यंत आवश्यक आहे, असे मत बहुजन नेते, माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांनी शनिवारी (ता.७) व्यक्त केले. नुकत्याच सादर करण्यात आलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीचे २०० वे वर्ष, संत गाडगेबाबा यांचे १५० वे जयंती वर्ष तसेच २०२६-२७ हे वर्ष सामाजिक समता आणि समरसता वर्ष म्हणून साजरे करण्याची घोषणा केल्याबद्दल डॉ.चलवादी यांनी राज्य सरकारचे आभार मानले आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सामाजिक परिवर्तन घडवणाऱ्या महामानवांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी समिती स्थापन करून विविध सामाजिक कार्यक्रम राबविण्याची घोषणा केली आहे. संत गाडगेबाबा ग्राम योजना राबविणे, तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाड येथील चवदार तळ्याच्या परिसरातील सोयी-सुविधा विकसित करण्याचा निर्णयाचे देखील डॉ.चलवादी यांनी स्वागत केले आहे.

एवढे प्रयत्न करून देखील देशात आणि राज्यातील बहुजनांवरील अत्याचारांच्या घटनेत कुठलीही घट होतांना दिसत नाही.अल्पसंख्याकांवरील अत्याचारात देखील वाढ झाली आहे. नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरो (एनसीआरबी) च्या २०२३ च्या अहवालानुसार देशभरात अनुसूचित जातींवरील अत्याचारांची ५७,७८९ प्रकरणे नोंदली गेली असून हा दर प्रति लाख लोकसंख्येमागे २८.७ इतका आहे.अनुसूचित जमातींवरील अत्याचारांची १२,९६० प्रकरणे नोंदली गेली असून मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे २८ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

महाराष्ट्रातही या प्रकारच्या गुन्ह्यांची नोंद लक्षणीय प्रमाणात झाली आहे. राज्यात अनुसूचित जातींवरील अत्याचारांची सुमारे २,७९४ प्रकरणे नोंदवली गेली असून प्रति लाख अनुसूचित जाती लोकसंख्येमागे हा दर सुमारे १५.५ इतका आहे. तर, अनुसूचित जमातींवरील अत्याचारांची सुमारे ४८२ प्रकरणे नोंदवली गेली असून त्याचा दर प्रति लाख लोकसंख्येमागे सुमारे ७.४ इतका आहे. राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेत महाराष्ट्रातील दर काहीसा कमी असला तरी या घटनांची संख्या चिंताजनक आहे, असे डॉ.चलवादी म्हणाले.

सामाजिक समता वर्ष साजरे करताना बहुजन समाजावर होणाऱ्या अन्यायाला आळा घालण्यासाठी अत्याचार प्रतिबंधक कायद्याची काटेकोर अंमलबजावणी, जलदगती न्यायप्रक्रिया आणि पीडितांना त्वरित संरक्षण देणारी यंत्रणा मजबूत करण्याची मागणी करीत सामाजिक समता ही केवळ घोषणांपुरती न राहता प्रत्यक्षात उतरावी, अशी अपेक्षा डॉ.चलवादी यांनी व्यक्त केली.

## 'द ज्वेल वन पेजेंट – मिस अँड मिसेस महाराष्ट्र २०२६' स्पर्धेच्या पुणे ऑडिशन्सची घोषणा

**पुणे (दै. संध्या) :**

स्मृती एंटरप्राईझेसच्या वतीने 'द ज्वेल वन पेजेंट – मिस अँड मिसेस महाराष्ट्र 2026' या भव्य राज्यस्तरीय सौंदर्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेच्या पुणे ऑडिशन्स 13 मार्च 2026 रोजी आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आज आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. या स्पर्धेच्या माध्यमातून महाराष्ट्रभरातील महिलांना आपली प्रतिभा, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व प्रभावीपणे सादर करण्याची संधी मिळणार आहे.

या पत्रकार परिषदेला स्मृती एंटरप्राईझेसच्या संचालिका स्मृती बोनगे, संचालक आधार शिंदे तसेच इवेंट पार्टनर सारिका तुळवे पाटील,अनिल व्यवहारे,ईशा यादव उपस्थित होते.




स्पर्धेच्या पुणे ऑडिशन्स 13 मार्च 2026 रोजी सदाशिव पेठ येथील सॅफ्रॉन बॅन्क्वेट्स येथे होणार असून यावेळी सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री प्रार्थना बेहरे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या स्पर्धेत 18 ते 55 वयोगटातील महिलांना सहभागी होता येणार असून नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. सहभागी महिलांसाठी विविध मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास आणि करिअरच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या स्पर्धेत विवाहित आणि अविवाहित महिलांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले असून अंतिम फेरीत विजेत्यांना एकूण 12 लाख रुपयांपर्यंतची बक्षिसे तसेच मनोरंजन, फॅशन आणि मॉडेलिंग क्षेत्रात पुढे जाण्याच्या विविध संधी मिळणार आहेत. महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये ऑडिशन्स आयोजित करण्यात येणार असून त्यातून निवड झालेल्या स्पर्धकांमध्ये ग्रँड फिनाले पार पडणार आहे. फिनाले मध्ये ज्या स्पर्धकांची निवड होईल अशा 40 स्पर्धकांना स्मृती एंटरप्राईझेस आणि पेंटेन स्टुडियोज प्रस्तुत 'जयोस्तुते' या म्यूजिक अल्बम मधे काम करण्याची संधी मिळणार आहे.

स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महिलांनी +91 91676 73663, +91 91522 23663, +91 90961 50750 या क्रमांकांवर संपर्क साधून नोंदणी करावी किंवा www.thejewelonepageant.com या संकेतस्थळावर नावनोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## 'एकच प्याला' संगीत नाटकाचा मोफत प्रयोग

**पुणे (दै. संध्या) :**

थोर मराठी नाटककार कै. राम गणेश गडकरी लिखित 'एकच प्याला' या शोकांतिका संगीत नाटकाचा प्रयोग मंगळवार, १० मार्च २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे संपन्न होणार आहे. हा नाट्यप्रयोग सर्वांसाठी विनामूल्य खुला असून, स्वरराज छोटा गंधर्व प्रतिष्ठान तर्फे याचे आयोजन करण्यात आले आहे. स्वरराज छोटा गंधर्व यांची १०८ वी जयंती १० मार्च रोजी असून त्यानिमित्त याचे आयोजन करण्यात आले आहे. याच कार्यक्रमात मराठी नाटक व चित्रपट क्षेत्रात अजरामर भूमिका केलेल्या ज्येष्ठ अभिनेत्री नयना आपटे यांना



'कोहिनूर नाट्यरत्न पुरस्कार' देऊन गौरविले जाणार आहे. कोहिनूर ग्रुपचे अध्यक्ष श्री. कृष्णकुमार गोयल हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील अशी माहिती प्रतिष्ठानच्या उपाध्यक्ष सौ. सुचेता अवचट यांनी दिली.

# लोकपरंपरेतील बाईपण ते आत्मभान देणारं आजचं माणूसपण

"बाई म्हणे देवा, नको सोन्याचा हार, मान द्यावा जगाने, तोच माझा श्रृंगार" या ओवीतील शब्दांतून स्त्रीच्या सन्मानाच्या अपेक्षा पूर्वीपासून वारंवार व्यक्त होताना दिसतात. या अपेक्षापूर्तीसाठी सामाजिक जाणिवेच्या भावनेतून राज्य शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून महिलांना आत्मसन्मान मिळवून देण्याचे प्रयत्न केले आहेत. चूल आणि मुल या चौकटीत अडकलेल्या स्त्रीला आत्मविश्वासाने माणूस म्हणून जगण्याचा हमरस्ता उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया शासनाने सुरू केली. जुन्या लोकपरंपरागत गीतांमधून व्यक्त होणाऱ्या तिच्या कोंडलेल्या श्वासापासून ते लोकशाही व्यवस्थेत तिला मिळालेल्या बळापर्यंतच्या प्रवासावर प्रकाश टाकणारा हा लेख....!!

भारतीय ग्रामीण जीवनाचा विचार केला, तर स्त्रीचे आयुष्य अनेकदा श्रम, जबाबदाऱ्या आणि कुटुंबाच्या अपेक्षांनी वेढलेले दिसते. घर, शेत, कुटुंब आणि नातेसंबंध यांची जबाबदारी सांभाळत ती शांतपणे आयुष्याची वाट चालत होती. बाहेरून पाहताना तिचे जगणे सहनशीलतेचे आणि मूक स्वीकाराचे वाटत असले, तरी लोकपरंपरेच्या अंतरंगात डोकावले की ग्रामीण स्त्रीचे वेगळेच रूप समोर येते. विशेषतः ओव्या, श्रमगीते आणि जात्यावरच्या गाण्यांमध्ये तिच्या मनातील भावना, अनुभव आणि न्यायाची जाणीव स्पष्टपणे व्यक्त होताना दिसते.

पूर्वीच्या ग्रामीण जीवनात स्त्रीचा दिवस पहाटेपासून सुरू होत असे. घरातील कामे उरकताना, विशेषतः जात्यावर दळण दळताना स्त्रियांच्या ओठांवरून ओव्या उमटत. दळणाच्या तालासोबत शब्दांची लय जुळत जाई आणि त्या लयीमध्ये तिच्या मनातील भावना व्यक्त होत असत.

"जात्यावर दळते मी ज्वारी,माझं मन गेलं माहेरच्या दारी"

या ओवीतून माहेराविषयीची ओढ आणि सासरीच्या आयुष्याची जाणीव सहजपणे व्यक्त होते.

ग्रामीण जीवनात स्त्रीची भूमिका केवळ घरापुरती मर्यादित नव्हती. शेतात निंदणी, कापणी, रोप लावणी यांसारख्या विविध कामांमध्ये स्त्रिया सक्रियपणे सहभागी होत. एकत्र काम करताना त्या गाणी म्हणत आणि त्या गाण्यांतून आपल्या आयुष्याविषयीच्या भावना व्यक्त करत.

"निंदणीची ओळ लांब, ऊन माथ्यावरती,बाईच्या जीवाला वेळ कुठे विश्रांती..."

या ओवीतून स्त्रीच्या कष्टमय जीवनाची आणि तिच्या अखंड श्रमांची जाणीव दिसून येते. लोकपरंपरेतील ओव्यांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्या स्त्रीच्या अनुभवांना आणि विचारांना अभिव्यक्ती देतात. अनेकदा या ओव्यांमधून स्त्री आपल्या आयुष्यातील प्रश्नही मांडताना दिसते.

"सासू म्हणे काम कर,नणंद म्हणे ते नको हे कर, या बाईच्या जीवाला बघा कोण विचारं?"

या ओवीतून घरातील जबाबदाऱ्या पार पाडताना स्त्रीला भेडसावणाऱ्या परिस्थितीचे प्रतिबिंब दिसते.

प्रसिद्ध लोकसाहित्य अभ्यासक ताराबाई भावळकर यांनी ग्रामीण स्त्रियांच्या ओव्यांचा अभ्यास करताना नमूद केले आहे की या ओव्या केवळ मनोरंजनासाठी नसून त्या स्त्रियांच्या अंतर्मनातील अनुभवांचे आणि भावविश्वाचे प्रतिबिंब आहेत. ग्रामीण स्त्रीला समाजात उघडपणे बोलण्याची संधी कमी मिळत होती; त्यामुळे ती ओव्यांच्या माध्यमातून आपल्या वेदना, प्रश्न आणि न्यायाची जाणीव व्यक्त करत असे.

आजच्या बदलत्या जीवनशैलीत जात्यावर दळण दळणे किंवा शेतात सामूहिकपणे गाणी म्हणण्याच्या परंपरा कमी झाल्या असल्या तरी या ओव्यांमध्ये जपलेली स्त्रीची संवेदना आणि अनुभव आजही लोकस्मृतीत जिवंत आहेत. लोकपरंपरेतील या ओव्या म्हणजे ग्रामीण स्त्रीच्या आयुष्याचा मौखिक इतिहासच मानता येईल.



**युवराज पाटील, जिल्हा माहिती अधिकारी, पुणे**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने या लोकपरंपरेतील ओव्यांकडे पाहिले, तर स्त्रीच्या वेदनांना अभिव्यक्ती देणारी परंपरा आपल्या समाजात पूर्वीपासून अस्तित्वात असल्याचे दिसून येते. या ओव्या केवळ लोकसाहित्याचा भाग नसून त्या स्त्रीच्या भावना, श्रम आणि आत्मसन्मानाची जाणीव करून देणाऱ्या महत्त्वाचा सांस्कृतिक ठेवा आहेत. आधुनिक काळात बाईपणाला मानवी मूल्य प्राप्त करून देण्यासाठी शासनाने स्त्रियांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी विविध लोकाभिमुख योजना राबवून महिलांना आत्मभान आणि स्वावलंबनाची नवी दिशा दिली. ग्रामीण व शहरी भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून स्वयं-सहाय्यता गटांची चळवळ उभी केली. या गटांमुळे लाखो महिलांना बचत, कर्जसुविधा आणि लघुउद्योगांच्या संधी उपलब्ध झाल्या.

महिलांच्या आरोग्य आणि सन्मानाचा विचार करून राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य योजना, मातृत्व सहाय्य योजना तसेच ग्रामीण भागात सुरक्षित प्रसूतीसाठी विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सावित्रीबाई फुले यांच्या नावाने राबविल्या जाणाऱ्या विविध शैक्षणिक योजना, शिष्यवृत्ती आणि निवासी वसतिगृहे यामुळे अनेक मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे.

ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी 'उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण आजीविका अभियान' प्रभावीपणे राबविले जात आहे. या अभियानाच्या माध्यमातून महिलांचे स्वयं-सहाय्यता गट तयार होऊन बचत, उत्पादन, विपणन आणि लघुउद्योगांना चालना मिळत आहे. यामुळे महिलांना आर्थिक स्वावलंबनासोबतच सामाजिक नेतृत्वाची संधीही मिळू लागली आहे.

याशिवाय महिलांच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी राज्य शासनाने सुरू केलेली मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना ही विशेष महत्त्वाची ठरत आहे. या योजनेद्वारे पात्र महिलांना दरमहा आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जात असून त्यामुळे त्यांच्या दैनंदिन जीवनातील गरजा भागविण्यास मदत होते. या योजनेमुळे महिलांच्या हातात थेट आर्थिक बळ मिळून त्यांचे आत्मभान आणि स्वावलंबन अधिक दृढ होत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना दिलेल्या आरक्षणामुळे महिलांना निर्णय प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर सहभाग मिळत आहे. त्यामुळे समाजाच्या विकासात महिलांचे नेतृत्वही अधिक प्रभावीपणे पुढे येत आहे. या सर्व उपक्रमांमुळे आजची स्त्री केवळ घरापुरती मर्यादित राहिलेली नाही. ती राजकारण, विज्ञान, उद्योग, प्रशासन, क्रीडा आणि शिक्षण अशा विविध क्षेत्रांत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आपले कर्तृत्व सिद्ध करत आहे. तिच्या कार्याचा समाजात गौरव होत आहे आणि तिच्या योगदानाला योग्य तो बहुमानही मिळत आहे.

लोकपरंपरेतील ओव्यांतून उमटलेली स्त्रीची न्यायाची जाणीव आणि आत्मसन्मानाची भावना आजच्या लोकाभिमुख शासन व्यवस्थेनी राबविलेल्या विविध योजनामुळे अधिक व्यापक स्वरूपात प्रत्यक्ष परिवर्तीत होऊन पुढे येताना दिसते आहे. लोकपरंपरेतील मूक वेदना, संघर्ष आणि आत्मसन्मानाचा शोध घेत चालणारी स्त्री आज शासनाच्या विविध योजनांच्या बळावर अधिक सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि स्वावलंबी बनत आहे.

म्हणूनच लोकपरंपरेतील बाईपणापासून आत्मभानाने उभ्या राहिलेल्या आधुनिक स्त्रीपर्यंतची ही वाटचाल केवळ एका व्यक्तीच्या आयुष्याची कथा नाही; ती महाराष्ट्राच्या सामाजिक प्रगतीची दिशा आहे.

लोकपरंपरेतून उमटलेला तिचा मूक आवाज आज सन्मान, अधिकार आणि समानतेच्या नव्या पर्वात रूपांतरित होत आहे. पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून समाजघडणीत आपले योगदान देणारी ही नवी स्त्री आज अधिक सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि स्वावलंबी बनत आहे. म्हणूनच आजच्या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने इतकेच म्हणावेसे वाटते...

"बाईच्या कष्टांना मान,  
तिच्या स्वप्नांना आकाश,  
समानतेच्या वाटेवरच  
समाजाचा खरा विकास."

## थोडक्यात पण महत्वाचे...



### संजय जगताप मित्र परिवारातर्फे इफ्तार पार्टी

वाल्हे (दैनिक संध्या) : रमजान महिन्याचे औचित्य साधून माजी आमदार संजय चंदुकाका जगताप मित्र परिवारातर्फे वाल्हे ( ता.पुरंदर ) येथील शाही सुन्नी मशिदीत सालाबादप्रमाणे रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मुस्लीम बांधवांसह महिला वर्गाने देखील रोजा इफ्तार पार्टीत उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दर्शविल्याने मस्जिद परिसर अक्षरशः गजबजून गेला होता. यावेळी संजय जगताप मित्र परिवारातर्फे मुस्लीम समाजातील उपवास धारकांना रोजा इफ्तारीसाठी सरबत मिठाईसह फळांचे वाटप करण्यात आले.त्यानंतर मगरीबची नमाज अदा झाल्यावर रोजा इफ्तार पार्टी उत्साही वातावरणात साजरी करण्यात आल्याने मुस्लीम समाजातआनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. अशातच जातीय सलोखा अबाधित रहावा तसेच मित्रत्वाची भावना देखील वाढली पाहिजे या उद्देशाने आमदार संजय जगताप मित्र परिवाराकडून पुरंदर हवेलीतील सर्व मशिदीत इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अल्पसंख्यांक विभागाचे तालुकाध्यक्ष मोबीन बागवान यांनी दिली. या प्रसंगी मुस्लिम समाजाचे चांदभाई इनामदार आरिफ आतार आयुब इनामदार अरबाज नदाफ शौकत शेख आयान आतार जमिल शेख राजू इनामदार अस्लम शेख अक्रम इनामदार आदी मान्यवर उपस्थित होते.



### 'लग्नपंचमी'चा परदेश दौरा जाहीर; महाराष्ट्रातील यशानंतर जागतिक रंगभूमीवर झेप

पुणे (दैनिक संध्या) : मराठी रंगभूमीवर प्रचंड लोकप्रिय ठरलेल्या 'लग्नपंचमी' या धमाल विनोदी नाटकाचा आता परदेश दौरा जाहीर करण्यात आला आहे. मराठी भाषा गौरव दिनाच्या औचित्याने नाटकाच्या २५व्या प्रयोगानिमित्त निर्मात्यांनी ही घोषणा केली. मराठी नाटकाच्या इतिहासात इतक्या व्यापक स्तरावर विविध देशांमध्ये एकत्रित दौऱ्याची घोषणा होण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे सांगितले जात आहे. लेखिका मधुगंधा कुलकर्णी आणि दिग्दर्शक निपुण धर्माधिकारी यांच्या लेखन-दिग्दर्शनासह स्वप्नील जोशी आणि अमृता खानविलकर यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या नाटकाला महाराष्ट्रभर प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. केवळ दोन महिन्यांत या नाटकाचे २५ प्रयोग यशस्वीपणे पार पडले. नाटकाचा २५वा प्रयोग मुंबईतील रवींद्र नाट्य मंदिर येथे हाऊसफुल गर्दीत झाला. या प्रयोगावेळी फ्लिक्स प्ले एंटरटेन्मेंटचे निर्माते यतीन पाटील यांनी परदेश दौऱ्याची घोषणा केली. या दौऱ्याअंतर्गत अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, आशियातील विविध देश, मध्यपूर्व देश तसेच युरोप आणि युनायटेड किंग्डम येथे 'लग्नपंचमी'चे प्रयोग सादर करण्यात येणार आहेत. या दौऱ्याचा सविस्तर कार्यक्रम लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे निर्मात्यांनी सांगितले.

### नेटफ्लिक्सने 'हॅलो बच्चो' ही सीरीज खास स्क्रीनिंगद्वारे प्रेक्षकांसमोर आणली

पुणे (दैनिक संध्या) : नेटफ्लिक्सने 'हॅलो बच्चो'ही सीरीज़ भारतातील स्पर्धा परीक्षांसाठी ओळखल्या जाणाऱ्या प्रमुख शहरांमध्ये खास स्क्रीनिंगद्वारे दाखवली. यासाठी रीजेंट सिनेमा, पटना, व्हिक्टरी थिएटर, पुणे आणि सिटी मॉल फन सिनेमा, कोटा येथे विशेष स्क्रीनिंग दाखवण्यात आले. या सर्व ठिकाणी हाऊसफुल प्रेक्षकांसह उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा, स्वप्नांचा आणि संघर्ष साजरे करणारा हा एक खास अनुभव ठरला. पुण्यातील व्हिक्टरी थिएटर, येथे या स्क्रीनिंगला जबरदस्त प्रतिसाद मिळाला. येथे 490 विद्यार्थी आणि स्टाफ उपस्थित होते आणि संपूर्ण हॉल भरून गेला होता. भारतातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुणे हे महत्त्वाचे शहर मानले जाते, त्यामुळे हा क्षण खास ठरला. तसेच कोटा, ज्याला देशाची कोचिंग राजधानी म्हटले जाते, आणि पटना सारख्या मोठ्या विद्यार्थी केंद्रांमध्येही स्क्रीनिंगदरम्यान मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक आणि कुटुंबीय उपस्थित होते. चित्रपट पाहताना अनेकांना त्यात स्वतःचा संघर्ष आणि स्वतःच्या स्वप्नांची झलक दिसली. स्क्रीनिंगदरम्यान सर्व ठिकाणी वातावरण उत्साहाने भरलेले होते, पण त्याचवेळी अनेक जण भावुकही झाले होते. अनेक ठिकाणी प्रेक्षकांनी स्वतःहून टाळ्या वाजवल्या आणि काहींच्या डोळ्यात पाणीही आले. पुणे येथील एका विद्यार्थ्याने सांगितले, "मी येथे या सीरीजचे पहिले दोन एपिसोड पाहिले आणि ते खूप प्रेरणादायी वाटले. स्क्रीनवर जणू माझ्याच विद्यार्थी जीवनातील संघर्षाची कथा दाखवली जात आहे असे वाटले. या मालिकेत दाखवले आहे की विद्यार्थी शून्यापासून सुरुवात करून शिक्षणाच्या जोरावर आपली परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न कसा करतात." विद्यार्थ्यांच्या या प्रतिक्रियेतून मालिकेत दाखवलेली जिद्द आणि संघर्षाची भावना स्पष्टपणे दिसून येते. तसेच पटना येथील एका विद्यार्थ्याने सांगितले, "या मालिकेच्या दोन एपिसोडमध्ये जे दाखवले आहे, त्याच टप्प्यातून मीही सध्या जात आहे. ही सीरीज खूप प्रेरणादायी आहे. आता मला अजून मेहनत करून अभ्यास करायचा आहे आणि इंडियन इंस्टिट्यूट ऑफ़ टेक्नोलॉजी मध्ये प्रवेश घ्यायचा आहे." यावरून ही कथा त्यांच्या आयुष्याशी किती जवळून जुळते हे दिसून येते.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E Tender) from registered contractors / agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following works. **Tender No.:- SE/EHV/O&M/Circle/T/SRM/E-Tender-80/2025-26 RFX No. 7000039200 Subject:-** E-tender for Work of Servicing / Overhauling of operating mechanism of CGL make, 145kV&245kV SF6 Circuit Breakers with supply of mandatory & minimum optional spares at various Substations under EHV O&M Manchar Division under EHV O&M Circle Pune. **Tender Amount:-** Rs. 91,08,395/- (incl taxes), **EMD:-** Rs. 77,190/- (Ex. Taxes) **Tender Fees:-** Rs. 500/- + GST). **Download of tender documents:-** from Dtd. 07.03.2026 to Dtd. 23.03.2026 up to 11:00 hrs. **Bid Opening:-** Dtd. 23.03.2026 after 11:05 Hrs. (Tech) Dtd. 24.03.2026 after 11:00 Hrs. (Price)

For further details visit our website **http://mahatransco.in** and open above RFX for downloading tender document, schedules, and annexures.

Further, please note that, in case, if above tender will be refloated, it will be published on our website viz. **www.mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV O&M Circle, Pune**

# स्त्रियांना बंधनात ठेवण्यात कसला आलाय पुरुषार्थ?

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

**समाजाच्या रचनेत स्त्री आणि पुरुष हे दोन्ही समान आणि परस्परपूरक घटक आहेत. तरीही अनेक शतकांपासून स्त्रियांना विविध बंधनांत ठेवण्याची परंपरा समाजात रूढ झाली. घराच्या चार भिंतीतच स्त्रीचे आयुष्य मर्यादित ठेवले गेले, तिच्या स्वप्नांवर आणि इच्छांवर अनेक बंधने घातली गेली. मात्र आजच्या प्रगत आणि जागरूक समाजात एक प्रश्न ठामपणे विचारला जात आहे. स्त्रियांना बंधनात ठेवण्यात कसला आलाय पुरुषार्थ?**

महिला दिन विशेष



खरा पुरुषार्थ म्हणजे स्त्रीला दडपून ठेवणे नव्हे, तर तिच्या क्षमतेचा सन्मान करणे. तिच्या स्वप्नांना पंख देणे, तिच्या कर्तृत्वाला संधी देणे आणि तिच्या अस्तित्वाला मान्यता देणे हाच खरा पुरुषार्थ आहे. स्त्रीला कमी लेखणे किंवा तिला मर्यादित ठेवणे ही कोणत्याही समाजाची प्रगती रोखणारी गोष्ट आहे. आजच्या काळात स्त्रिया शिक्षण, उद्योग, विज्ञान, क्रीडा, कला, प्रशासन अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. त्या कुटुंब सांभाळतानाच समाजाच्या विकासातही मोठा वाटा उचलत आहेत. त्यामुळे स्त्रियांच्या क्षमतेवर प्रश्न उपस्थित करण्याचे कोणतेही कारण उरलेले नाही. उलटपक्षी, त्यांच्या कर्तृत्वामुळे समाज अधिक सक्षम होत आहे.

परंतु काही ठिकाणी अजूनही जुनाट विचारसरणीचे सावट दिसून येते. स्त्रीने काय करावे, कसे वागावे, किती बोलावे यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. तिच्या शिक्षणावर, करिअरवर किंवा स्वप्नांवर बंधने घातली जातात. अशा वृत्तीमुळे स्त्रीचे व्यक्तिमत्त्व मर्यादित होते आणि समाजाची प्रगतीही खुंटते. स्त्री ही केवळ घर सांभाळणारी व्यक्ती नाही; ती कुटुंबाची आधारस्तंभ आहे. तिच्या कष्टांमुळे आणि त्यागामुळे अनेक कुटुंबे उभी राहतात. आई, बहीण, पत्नी, मुलगी या विविध नात्यांतून ती प्रेम, जिव्हाळा आणि जबाबदारी यांचे सुंदर उदाहरण घालून देते. त्यामुळे स्त्रीचा सन्मान करणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नाही, तर ती प्रत्येक व्यक्तीचे नैतिक कर्तव्य आहे.

समाज खऱ्या अर्थाने प्रगत होण्यासाठी स्त्री आणि पुरुष यांच्यात समानता असणे आवश्यक आहे. स्त्रीला शिक्षण, स्वावलंबन आणि निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले तर ती समाजासाठी मोठे योगदान देऊ शकते. स्त्रीला पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन देणे, तिच्या क्षमतेवर विश्वास ठेवणे आणि तिच्या स्वप्नांना साथ देणे हेच समाजाच्या विकासाचे खरे सूत्र आहे.

आजच्या काळात अनेक पुरुषही या बदलाचा स्वीकार करत आहेत. ते महिलांच्या प्रगतीला पाठिंबा देत आहेत आणि समानतेचा विचार समाजात रुजवत आहेत. ही सकारात्मक बदलाची सुरुवात आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने या विचाराला बळ दिले तर स्त्रियांसाठी अधिक सुरक्षित, सन्माननीय आणि प्रगत वातावरण निर्माण होईल.

महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे. आपण स्त्रियांना खरोखरच समान संधी देत आहोत का? त्यांच्या स्वप्नांना प्रोत्साहन देत आहोत का?

कारण खरा पुरुषार्थ स्त्रियांना रोखण्यात नाही, तर त्यांना सन्मानाने जगू देण्यात आणि त्यांच्या कर्तृत्वाला बळ देण्यात आहे.

स्त्रीला बंधनात ठेवण्यात कोणताही अभिमान नाही; अभिमान आहे तो तिच्या स्वातंत्र्याचा आणि तिच्या यशाचा साक्षीदार होण्यात.

## नेक्सस वेस्टएंड मॉलमध्ये महिलांसाठी 'थ्रेडस अँड टोट' विणकाम कार्यशाळा

**पुणे (दै. संध्या) :**

औंध येथील वेस्टएंड मॉल मध्ये या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त, ८ मार्च रोजी दुपारी १२:०० ते २:०० आणि संध्याकाळी ५:०० ते ७:०० या वेळेत महिलांसाठी 'थ्रेडस अँड टोट' या विणकाम कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत सर्व पुणेकर महिलांना आरामदायी आणि आकर्षक वातावरणात सुंदर विणकाम कला शिकून सर्जनशील पद्धतीने हा प्रसंग साजरा करण्याचे आमंत्रण आहे. ८९९ रुपयांपासून सुरू होणाऱ्या या कार्यशाळेत विणकामाच्या मूलभूत गोष्टी शिकवल्या जातील आणि रंगीत विणलेले पंच तयार केले जातील. त्यानंतर हस्तनिर्मित पंच कापसाच्या टोट बॅगवर शिवला जाईल, ज्यामुळे सहभागींना त्यांनी स्वतः तयार केलेली एक अनोखी आणि वैयक्तिकृत बॅग आणि काही सुंदर आठवणी घरी घेऊन जाता येतील. या विशेष उपक्रमाद्वारे, नेक्सस वेस्टएंड मॉल सर्जनशीलता, शिक्षण आणि आत्म-अभिव्यक्ती साजरी करण्यासाठी महिला ग्राहकांना एकत्र आणण्याचे उद्दिष्ट ठेवते.

ही विणकाम कार्यशाळा नवीन कलाकृती वापरून पाहण्याची, आरामदायी सर्जनशील अनुभवाचा आनंद घेण्याची आणि एक संस्मरणीय आठवण म्हणून सुंदर हस्तनिर्मित टोट बॅग घरी घेऊन जाण्याची एक अनोखी संधी देते.

## हडपसर-यवत सहा पदरी उड्डाणपुलासाठी ५,२६२ कोटींची तरतूद

**यवत (दै. संध्या) :**

**■ अर्थसंकल्पात निधी मंजुरीबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांची मोठी घोषणा**

> गेल्या वर्षभरापासून मी या सहा पदरी उड्डाणपुलासाठी राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. आजच्या अर्थसंकल्पात ५,२६२ कोटी रुपयांची तरतूद झाल्याने पुण्याच्या ग्रामीण भागाच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती मिळणार आहे. दौंडच्या जनतेच्या वतीने मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो.
>
> **— राहुल कुल, आमदार, दौंड विधानसभा**

पुणे-सोलापूर महामार्गावरील हडपसर ते यवत दरम्यान होणारी वाहतूक कोंडी फोडण्यासाठी आणि दौंड तालुक्याच्या विकासाला गती देण्यासाठी आमदार राहुल कुल यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सादर केलेल्या अर्थसंकल्पात या सहा पदरी उड्डाणपुलासाठी ५ हजार २६२ कोटी रुपयांच्या निधीची भरीव तरतूद जाहीर केली आहे. या निर्णयामुळे दौंड तालुक्याच्या औद्योगिक आणि व्यावसायिक विकासाचे नवे दालन उघडले जाणार आहे. पुणे शहरातून दौंड तालुक्यात प्रवेश करण्यासाठी हडपसर-यवत हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मात्र, वाढत्या शहरीकरणामुळे या मार्गावर तासनतास वाहतूक कोंडी होत असते. प्रस्तावित सहा पदरी उड्डाणपुलामुळे पुणेकरांना आणि दौंडमधील नागरिकांना विनाअडथळा आणि जलदगतीने प्रवास करता येणार आहे. यामुळे वेळ आणि इंधनाची मोठी बचत होणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे यवत, केडगाव, भांडगाव, खोर, वरवंड आणि पाटस या भागांमध्ये गुंतवणूकदारांचा ओढा वाढणार आहे. पुण्याच्या विस्तारणाऱ्या सीमांमुळे या परिसरात नवीन कारखाने आणि उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्माण होईल, महामार्गालगत वेअरहाउसिंग आणि लॉजिस्टिक क्षेत्राचा मोठा विकास होईल, कनेक्टिव्हिटी सुधारल्यामुळे गृहनिर्माण प्रकल्पांसाठी विकासकांचे लक्ष या भागाकडे वेधले जाईल. दौंड तालुक्याच्या पश्चिम भागातील खोर, भांडगाव, वासुंदे, जिरेगाव या जिरायती पट्ट्याला आगामी पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाचा मोठा फायदा होणार आहे. महामार्ग, उड्डाणपूल आणि नियोजित विमानतळ या तिन्ही गोष्टींमुळे या परिसराचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलणार असून, हा प्रकल्प दौंडसाठी 'टर्निंग पॉईंट' ठरणार आहे. आमदार राहुल कुल यांच्या प्रयत्नांमुळे हा ऐतिहासिक निधी मंजूर झाल्याने स्थानिक नागरिक, व्यापारी आणि शेतकरी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण आहे. या प्रकल्पामुळे दौंड तालुक्याचे अर्थकारण बदलणार असून रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील, अशी भावना व्यक्त होत आहे.

## राज्य सरकारच्या भूमिकेचे नागरिक सोशल फाउंडेशनकडून स्वागत

**पुणे (दै. संध्या) :**



राज्यात वाढत्या बेकायदेशीर धर्मांतराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने तातडीने "महाराष्ट्र फ्रीडम ऑफ रिलीजन (Prevention of Fraud & Coercion) Act" पारित करून लागू करावा, अशी मागणी नागरिक सोशल फाउंडेशन (NSF) या सामाजिक संस्थेने केली होती. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने नुकतीच कॅबिनेट बैठकीत हा कायदा आणण्याची तयारी केली आहे, राज्य सरकारच्या या भूमिकेचे नागरिक सोशल फाउंडेशनकडून स्वागत करण्यात आले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा कायदा आणण्याचे सुतोवाच केल्याने त्यांचे आणि राज्य सरकारचे आभार माणण्यासाठी पुणे श्रमिक पत्रकार संघात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी सीए सर्वेश मेहेंदळे, संचालक प्रीतम थोरवे, पुष्कर सप्रे उपस्थित होते


नागरिक सोशल फाऊंडेशनने मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात नमूद केले होते की, महाराष्ट्रातील आदिवासी बहुल भाग विशेषतः धुळे, नंदुरबार, पुणे आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये बळजबरी, फसवणूक किंवा प्रलोभनाद्वारे धर्मांतराच्या तक्रारी सातत्याने येत आहेत. अशा प्रकारचे अवैध धर्मांतर हे व्यक्तीच्या धार्मिक स्वातंत्र्यावर गदा आणणारे असून सामाजिक सौहार्दालाही गंभीर धोका निर्माण करणारे आहे.

संस्थेने स्पष्ट केले आहे की धर्मांतर हे केवळ व्यक्तीच्या श्रद्धा, स्वेच्छा आणि जाणिवेवर आधारित असावे; दबाव, फसवणूक, आर्थिक लाभ किंवा इतर प्रलोभनाद्वारे केलेले धर्मांतर अवैध ठरले पाहिजे. अशा कायद्यामुळे धार्मिक स्वातंत्र्याचा आदर राखत सर्व समुदायांचे संरक्षण, धार्मिक समरसता आणि सामाजिक शांतता दृढ होऊ शकते. तसेच परकीय निधी किंवा अनधिकृत धार्मिक बांधकामांचा गैरवापर थांबवता येईल, आणि दोषी संस्था किंवा व्यक्तींवर कठोर कारवाई करता येईल. नागरिक सोशल फाउंडेशनने सार्वजनिक जनजागृती, सामाजिक संशोधन, कायदेविषयक अभ्यास, तसेच कायदा अंमलबजावणीसाठी आवश्यक असणारे डेटा, दस्तऐवज आणि समुदाय संवादाच्या प्रक्रियेत राज्य सरकारला सर्वतोपरी सहकार्य करण्याची तयारी दर्शवली आहे. बेकायदेशीर धर्मांतर हा मुद्दा प्रसार माध्यमांनी व्यवस्थित हाताळल्याने हा कायदा होण्याच्या दृष्टीने पाऊल पडले आहे यामुळे नागरिक सोशल फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व पत्रकार, वृत्तपत्रे आणि वृत्त वाहिन्यांचे आभार मानले.

## 'अंधा प्यार २.०'चा ट्रेलर प्रदर्शित; १४ मार्चपासून ZEE5वर होणार प्रीमियर

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

ZEE5ने आपल्या नवीन नॉन-फिक्शन रिॲलिटी डेटिंग सीरिज 'अंधा प्यार 2.0'चा अधिकृत ट्रेलर प्रदर्शित केला आहे. आधुनिक नातेसंबंध आणि डेटिंगच्या बदलत्या संकल्पनांवर आधारित ही सीरिज १४ मार्चपासून हिंदी ZEE5वर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.




या ट्रेलरमध्ये धारदार विनोद, प्रामाणिक संवाद आणि अनपेक्षित नाट्यमय वळणांची झलक पाहायला मिळते. हा सीझन खासकरून जेन झी प्रेक्षकांना लक्षात घेऊन तयार करण्यात आला असून आधुनिक रोमँसचे वेगळे रूप यात दाखवण्यात आले आहे. विवेक समतानी आणि कौस्तुभ अगरवाल यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमात सिंगल व्यक्तींना एक अनोखा डेटिंग अनुभव दिला जातो. यात सहभागी व्यक्ती एकमेकांना प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय संवाद साधतात आणि नाते निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे शारीरिक आकर्षणाऐवजी भावनिक जुळवणूक आणि प्रामाणिक संवाद यांना अधिक महत्त्व दिले जाते.

या सीरिजमध्ये समालोचकांचा एक पॅनलही असणार आहे, जे स्पर्धकांच्या संवादांवर भाष्य करताना विनोदाची फोडणी देतात आणि सामाजिक दृष्टिकोनातूनही या नात्यांकडे पाहतात.

## महिला दिनानिमित्त कॅसाग्रँड कॅलेडियमची खास ऑफर

**पुणे (दै. संध्या) :**

**■ घर खरेदी करणाऱ्या महिलांना ४६ ग्रॅम सोन्याचे नाणे भेट**

महिला दिनाच्या निमित्ताने महिलांना स्वतःचे घर खरेदी करण्यासाठी प्रोत्साहन देत कॅसाग्रँडने पुण्यातील अप्पर खराडी परिसरातील कॅसाग्रँड कॅलेडियम या प्रीमियम निवासी प्रकल्पात विशेष ऑफर जाहीर केली आहे. या ऑफरअंतर्गत ८ आणि ९ मार्च २०२६ रोजी घर बुक करणाऱ्या महिला ग्राहकांना ४६ ग्रॅम सोन्याचे नाणे भेट म्हणून दिले जाणार आहे.

महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचा आणि महत्त्वपूर्ण आर्थिक निर्णयांमधील त्यांच्या सहभागाचा सन्मान करण्यासाठी ही ऑफर सादर करण्यात आली आहे. रिअल इस्टेटमध्ये गुंतवणूक करून स्वतःचे घर घेणाऱ्या महिलांना प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे कंपनीने सांगितले.

भारतात सोन्याला पारंपारिकरित्या समृद्धी आणि सुरक्षिततेचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे या ऑफरच्या माध्यमातून महिलांच्या कुटुंब घडविण्यातील आणि आर्थिक निर्णयांमधील भूमिकेचा गौरव करण्याचा प्रयत्न कॅसाग्रँडकडून करण्यात आला आहे.

कॅसाग्रँड कॅलेडियम हा प्रीमियम निवासी प्रकल्प पुण्यातील वेगाने विकसित होत असलेल्या अप्पर खराडी परिसरात स्थित आहे. येथे आधुनिक सुविधा, उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी तसेच आयटी हब, शाळा आणि विविध लाइफस्टाइल सुविधा सहज उपलब्ध आहेत.

कॅसाग्रँडच्या या महिला दिनाच्या उपक्रमाद्वारे महिलांचा सन्मान करत त्यांना सक्षम बनवण्याचा प्रयत्न करण्यात येत असून भविष्यासाठी सज्ज निवासी समुदायात गुंतवणूक करण्याची संधी ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. हा प्रकल्प महाराष्ट्र रिअल इस्टेट रेग्युलेशन ॲक्ट (RERA) अंतर्गत नोंदणीकृत असून त्याचा नोंदणी क्रमांक P52100080302 आहे.

## विवोची V70 आणि V70 एलिटसाठी नवी मोहीम

**मुंबई (दै. संध्या) :**




**सिद्धार्थ मल्होत्रा-कियारा अडवाणींची खास उपस्थिती**

विवो इंडियाने V70 आणि V70 एलिट स्मार्टफोनसाठी नवीन डिजिटल व्हिडिओ मोहीम सुरू केली असून त्यामध्ये ब्रँड ॲम्बेसेडर सिद्धार्थ मल्होत्रा आणि कियारा अडवाणी प्रमुख भूमिकेत दिसत आहेत. जीवनातील खास आणि संस्मरणीय क्षण टिपण्यावर आधारित ही मोहीम प्रीमियम इमेजिंग तंत्रज्ञानाची ताकद दाखवते.

कथाकथनाच्या शैलीत तयार केलेल्या या चित्रपटात सिद्धार्थ आणि कियारा त्यांच्या आयुष्यातील काही खास आठवणी पुन्हा अनुभवताना दिसतात. लग्नापूर्वीचा प्रस्ताव आणि जवळीकपूर्ण समारंभ यांसारख्या भावनिक प्रसंगांमधून आनंद, जवळीक आणि त्या क्षणांचे महत्त्व प्रभावीपणे सादर करण्यात आले आहे. या मोहिमेद्वारे विवो V70 आणि V70 एलिट हे जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांचे साथीदार म्हणून सादर करत आहे. प्रगत कॅमेरा तंत्रज्ञानामुळे रोजच्या अनुभवांनाही संस्मरणीय आठवणींमध्ये रूपांतरित करता येते, असा संदेश या मोहिमेतून देण्यात आला आहे.

या स्मार्टफोनमधील ५० एमपी नाईट टेलिफोटो कॅमेरा कमी प्रकाशातही स्पष्ट आणि तपशीलवार पोर्ट्रेट टिपण्यास सक्षम आहे. संध्याकाळी किंवा मंद प्रकाशात घेतलेल्या क्षणांमध्येही हा कॅमेरा उत्कृष्ट स्पष्टता आणि खोली प्रदान करतो. याशिवाय ४के व्हिडिओ रेकॉर्डिंगमुळे वापरकर्त्यांना सिनेमॅटिक दर्जाचे, स्पष्ट आणि सुरळीत व्हिडिओ रेकॉर्ड करता येतात.

ही मोहीम विवोच्या प्रीमियम स्मार्टफोन विभागातील वाढत्या उपस्थितीवरही प्रकाश टाकते. भावनिक कथाकथन आणि अत्याधुनिक कॅमेरा तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ब्रँड ग्राहकांच्या गरजांनुसार उत्पादन विकासावर भर देत असल्याचे या मोहिमेतून स्पष्ट होते.

विवोची ही नवी मोहीम डिजिटल प्लॅटफॉर्म, सोशल मीडिया आणि इतर प्रमुख माध्यमांवर प्रसारित केली जाणार आहे. अत्याधुनिक डिझाइन, दमदार परफॉर्मन्स आणि फ्लॅगशिप स्तरावरील कॅमेरा क्षमतांमुळे V70 आणि V70 एलिट स्मार्टफोन प्रत्येक खास क्षण सुंदरपणे टिपण्याचा अनुभव देतात.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने तरुणाला बेदम मारहाण; चार जणांना पोलिसांकडून अटक

पिंपरी (दैनिक संध्या) : दारू पिण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्याच्या रागातून एका तरुणावर हल्ला केल्याची घटना दापोडी परिसरात घडली आहे. या प्रकरणी चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी प्रांशू शाम बारमेडा (वय २५, रा. कृष्णानगर लेन नं. २, सांगवी, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. हा प्रकार ३ मार्च रोजी दापोडी येथील कुक्कडवाला मनी फॅक्टरींग दुकानासमोर घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश भिसे (पूर्ण नाव व पत्ता माहिती नाही), राम अशोक कांबळे (वय २४), संकेत भालचंद्र वाघमारे (वय २०) आणि वेदांत मोरे (वय २४, सर्व रा. दापोडी सिद्धार्थनगर, पुणे) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. चारही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. फिर्यादी दुकानात असताना आरोपी तेथे आले आणि दारू पिण्यासाठी एक हजार रुपये देण्याची मागणी केली. फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपींनी त्याला शिवीगाळ करत मारहाण केली. यावेळी एकाने फिर्यादीच्या नाकावर ठोसा मारल्याने त्याच्या नाकातून रक्त आले आणि फ्रॅक्चर झाले. तसेच इतर आरोपींनी हाताने मारहाण करून दुखापत केली आहे. या प्रकरणी दापोडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक देशमुख करत आहेत.




### महापौर निधी पुन्हा सुरु, रुग्णांना आर्थिक मदत

पिंपरी (दैनिक संध्या) : प्रशासकीय राजवटीत तब्बल चार वर्षे बंद असलेला महापौर निधीचे वितरण पुन्हा सुरू करण्यात आले आहे. एका रुग्णाला मदत म्हणून पाच हजार रुपयांचा धनादेश वाटपास सुरुवात केली आहे, असे महापौर रवी लांडगे यांनी शुक्रवार (दि. 6) सांगितले. प्रशासकीय राजवटीच्या लालफितीमुळे महापौर निधी बंद; शहरातील गोरगरीब, सर्वसामान्य रुग्णांची आर्थिक होरपळ, असे ठळक वृत्त 'पुढारी'ने 17 फेबुवारीला प्रसिद्ध केले होते. त्याची दखल घेऊन महापौर लांडगे यांनी पिंपरी-चिंचवड सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टची धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी केली. ट्रस्टचे अध्यक्ष महापौर असून, ट्रस्टमध्ये उपमहापौर (उपाध्यक्ष), सहआयुक्त (सचिव), मुख्य लेखापाल (खजिनदार), स्थायी समितीचे अध्यक्ष, विधी समितीचे सभापती, सत्तारूढ पक्षनेते, मुख्य लेखा परीक्षक व क्रीडा विभागाचे उपायुक्त (सदस्य) यांचा समावेश आहे. तसेच, आयुक्तांनी त्या ट्रस्टच्या नावाने सन 2026-27च्या अर्थसंकल्पात 5 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामुळे शहरातील गोरगरीब व सर्वसामान्य रुग्णांना पाच हजार रुपयांची आर्थिक मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यासंदर्भात महापौर लांडगे यांनी सांगितले की, शहरातील गोरगरीब व सर्वसामान्य रुग्णांची आर्थिक होरपळ होऊ नये म्हणून तातडीने कार्यवाही करीत बंद असलेला ट्रस्ट पुन्हा सुरू करण्यात आला आहे. तसेच, अर्थसंकल्पात 5 कोटी रुपयांची तरतूदही करण्यात आली आहे. रुग्णांना आर्थिक मदत देण्यास सुरूवात केली आहे. त्याचा पहिला धनादेश तयार करण्यात आला आहे. येत्या सोमवारी (दि.9) रुग्णास धनादेश दिला जाईल. या निधीसंदर्भात शहरातील गोरगरीब रुग्णांनी महापौर कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहनही महापौरांनी केले आहे. ती मदत तुटपुंजी असून, त्यात वाढ करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, अर्थसंकल्पात महापौर विकास निधीसाठी 50 कोटी रुपयांची तरतूद केली आहे, असे महापौरांनी सांगितले.

### पिंपरी-चिंचवड बनतेय ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरचे हब; 4 लाख रोजगारांची शक्यता

पिंपरी (दैनिक संध्या) : पुण्याबरोबर वाढते औद्योगिक केंद्र म्हणून विकसित होत असलेल्या पिंपरी-चिंचवड परिसरात ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरसाठी देशातील महत्त्वाचे केंद्र बनत आहे. या माध्यमातून मोठा रोजगार उपलब्ध होऊ शकेल. विशेषतः प्रत्येक जिल्ह्यात सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. त्यामुळे कुशल रोजगार निर्मितीचे लक्ष ठेवण्यात आले आहे. या माध्यमातून 4 लाख नोकऱ्या निर्माण होऊ शकेल. तसेच, आयटी व अभियांत्रिकी क्षेत्रातील तरुणांना फायदा होणार आहे. दरम्यान, या अर्थसंकल्पाचे शहरातील उद्योगक्षेत्रातून स्वागत करण्यात आले. औद्योगिक केंद्र म्हणून शहरासाठी या नव्या उद्योग धोरणाचा मोठा फायदा होणार आहे. त्यात 18 अतिविशाल औद्योगिक केंद्र उभारणे, केंद्राच्या माध्यमातून 50 लाख रोजगारनिर्मिती होईल. तसेच, अर्थसंकल्पात प्रत्येक जिल्ह्यात सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग उपक्रम आयुक्तालय आणि सेवा आयुक्तालय निर्माण करण्यात येणार आहे. हे आयुक्तालय जर पिंपरी चिंचवड शहरात झाले तर या माध्यमातून सर्वाधिक फायदा हा पुणे व पिंपरी-चिंचवड शहराला होण्याची शक्यता आहे. पुणे-लोणावळादरम्यान तिसरी आणि चौथी रेल्वे लाईन उभारण्यासाठी सुमारे 5,100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे पिंपरी-चिंचवड, आकुर्डी आणि तळेगाव येथील नोकरदार, विद्यार्थी तसेच औद्योगिक क्षेत्राला मोठा दिलासा मिळणार आहे. लोकल गाड्यांची संख्या वाढण्यासही मदत होणार आहे. दरम्यान, ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. यासाठी रेल्वे प्रवासी संघ, पिंपरी चिंचवड प्रवासी संघटना या माध्यमातून राज्यातील मंत्रीपासून ते केंद्रीय रेल्वे मंत्र्यांकडून पाठपुरावा केला आहे. दरम्यान, या निर्णयामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणखी बळकट होण्यास मदत होईल.

### पीएमआरडीएचे 43 हजार कोटींचे 204 प्रकल्प; पुण्याचा विकास वेगात

पिंपरी (दैनिक संध्या) : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) विविध प्रकल्पासाठी 43 हजार कोटी रुपये खर्चाच्या 204 प्रकल्पांचे जाळे विणले असून, यामुळे पुण्याच्या विकासाची दिशा आणि दशा दोन्ही बदलणार असल्याचा विश्वास पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी व्यक्त केला. 'पीएमआरडीए'च्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा सविस्तर आढावा सादर केला. पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन शहरांच्या सीमा ओलांडून विस्तारणाऱ्या या महानगराचा विचार केवळ आजचा नाही, तर पुढील 50 वर्षांच्या गरजा लक्षात घेऊन करण्यात आला आहे.

# अनुदान वाढीसाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना "साकडे"

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची निवेदनाद्वारे मागणी



पिंपरी (दै. संध्या) :

"श्रीक्षेत्र आळंदी हे वारकरी संप्रदायाचे पवित्र तीर्थक्षेत्र असून दरवर्षी लाखो भाविक येथे येत असतात. त्यामुळे यात्रेच्या काळात स्वच्छता, पाणीपुरवठा, प्रकाशयोजना आणि सुरक्षेसाठी नगरपरिषदेला मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. सध्याचे शासकीय अनुदान अपुरे पडत असल्याने ते वाढवणे आवश्यक आहे. या संदर्भात मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली असून, आळंदी नगरपरिषदेला सक्षमपणे काम करता यावे आणि भाविकांना उत्तम सुविधा मिळाव्यात यासाठी राज्य शासन सकारात्मक निर्णय घेईल, असा मला विश्वास आहे.
– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

श्रीक्षेत्र आळंदी येथे होणाऱ्या धार्मिक यात्रांसाठी आवश्यक खर्च वाढत असताना सध्याचे शासकीय अनुदान अपुरे पडत असल्याने ते वाढवण्याची मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. याबाबत त्यांनी सविस्तर पत्र पाठवून आळंदी नगरपरिषदेवरील आर्थिक ताण कमी करण्यासाठी तातडीने निर्णय घेण्याची विनंती केली आहे. आमदार लांडगे यांनी पत्रात नमूद केले आहे की, आळंदी नगरपरिषदेला सध्या यात्राकराच्या स्वरूपात केवळ १.६२ कोटी रुपयांचे अनुदान मिळते. मात्र, सन २०२३–२४ या कालावधीत यात्रेसाठी नगरपरिषदेला तब्बल २.७३ कोटी रुपयांचा खर्च करावा लागला. परिणामी, सुमारे १.११ कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च नगरपरिषदेच्या स्वतःच्या निधीतून करावा लागला आहे. त्यामुळे नगरपरिषदेवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे. याच आर्थिक तणावामुळे नगरपरिषदेची वीज देयके आणि शासकीय पाणीपट्टी मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहिल्याचेही त्यांनी पत्रात स्पष्ट केले आहे. यात्रेच्या व्यवस्थेसाठी मोठ्या प्रमाणावर स्वच्छता, प्रकाशयोजना, पाणीपुरवठा, वाहतूक नियंत्रण आणि सुरक्षा व्यवस्था उभारावी लागते. मात्र सध्याचे अनुदान या खर्चासाठी अपुरे ठरत असल्याने नगरपरिषदेला वारंवार स्वतःच्या निधीवर ताण येत आहे.

दरम्यान, संतश्रेष्ठ महाराजांचा संजीवन समाधी सोहळा होणार असून, या सोहळ्यासाठी राज्यभरातून लाखो वारकरी श्रीक्षेत्र आळंदी येथे येणार आहेत. त्यामुळे शहरातील पायाभूत सुविधा आणि व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याची आवश्यकता असल्याचे आमदार लांडगे यांनी अधोरेखित केले आहे. आळंदी नगरपरिषद प्रशासनानेही यासंदर्भात राज्य शासनाच्या नगरपरिषद संचालनालयाकडे अनुदान वाढीचा प्रस्ताव पाठवला असल्याची माहिती त्यांनी दिली. या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेचे कामकाज सुरळीत आणि सक्षमपणे चालण्यासाठी यात्रा अनुदानात वाढ करण्याबाबत संबंधित विभागाला तातडीने योग्य आदेश द्यावेत, अशी मागणी आमदार लांडगे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये भटक्या कुत्र्यांचा हैदोस

पिंपरी (दै. संध्या) :

- नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर
- प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत अधिकाऱ्यांवर कारवाईची नगरसेवक संदीप वाघेरे यांची मागणी



पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या काही महिन्यांपासून भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट मोठ्या प्रमाणात वाढला असून, त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. शहरातील विविध परिसरांमध्ये भटक्या कुत्र्यांच्या टोळ्या मुक्तपणे फिरताना दिसत असून, लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांवर कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या घटना वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक संदीप वाघेरे यांनी महानगरपालिका प्रशासनाच्या कामकाजावर तीव्र नाराजी व्यक्त करत पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.अरुण दगडे आणि प्रमोद बाबर यांच्यावर कारवाई करण्याची मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली आहे. महानगरपालिकेकडून दरवर्षी भटक्या कुत्र्यांच्या नसबंदी आणि लसीकरणासाठी लाखो रुपयांचा निधी खर्च केला जात असल्याचा दावा केला जातो. मात्र प्रत्यक्षात शहरात कुत्र्यांची संख्या कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अनेक सोसायट्या, गल्लीबोळ आणि सार्वजनिक उद्यानांमध्ये कुत्र्यांच्या टोळ्यांमुळे नागरिकांना मॉर्निंग वॉक करणेही कठीण झाले आहे. त्यामुळे महापालिकेच्या नसबंदी मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का, असा प्रश्न नगरसेवक वाघेरे यांनी उपस्थित केला आहे. या संदर्भात संदीप वाघेरे म्हणाले की, नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न हा प्रशासनासाठी सर्वोच्च प्राधान्याचा असायला हवा. मात्र सध्या या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसत आहे. कुत्र्यांच्या हल्ल्यांमुळे जखमी होणाऱ्या नागरिकांच्या वेदना प्रशासनाने समजून घेत ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. भटक्या कुत्र्यांच्या नसबंदी प्रक्रियेचे ऑडिट करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, आक्रमक कुत्र्यांसाठी स्वतंत्र निवारा केंद्रे उभारावीत तसेच 'डॉग बाइट'च्या घटनांनंतर तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध करून द्यावी, अशा प्रमुख मागण्या त्यांनी मांडल्या. दरम्यान, नागरिकांनीही या प्रश्नावर सक्रिय भूमिका घेत संबंधित पशुवैद्यकीय अधिकारी अरुण कुमार दगडे (9049190817 / 878-8070665), pcmc Helpline तसेच सारथी हेल्पलाईन नंबर 8888006666 यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन वाघेरे यांनी केले आहे.

# देहूतील संत तुकाराम महाराज जन्मस्थान मंदिराचा विकास आराखडा

देहूगाव (दै. संध्या) :

महाराष्ट्र शासनाच्या 2026-27 च्या अर्थसंकल्पात देहूकरांसाठी आणि वारकरी संप्रदायासाठी अत्यंत महत्त्वाची घोषणा करण्यात आली आहे. जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांचे देहू येथील जीर्ण झालेले घर तसेच जन्मस्थान मंदिराच्या जतन व संवर्धनासाठी विशेष विकास आराखडा तयार करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थमंत्री म्हणून 2026-27 चा अर्थसंकल्प सादर करताना पुणे जिल्ह्यासाठी विविध विकासकामांच्या घोषणा केल्या. त्यामध्ये श्रीक्षेत्र देहू येथील श्री संत तुकाराम महाराजांच्या जन्मस्थान मंदिराच्या जीर्णोद्धार व विकास आराखड्याचा समावेश आहे. या निर्णयामुळे श्री संत तुकाराम महाराजांचे जीर्ण घर व जन्मस्थान संरक्षित आणि विकसित होणार असून, परिसराचे सुशोभीकरण, ऐतिहासिक वास्तूंचे जतन तसेच भाविक व पर्यटकांसाठी आधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामुळे श्री संत तुकाराम महाराजांचा आध्यात्मिक वारसा जपला जाऊन देहू या पवित्र तीर्थक्षेत्राच्या विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वी आषाढी वारी 2025 दरम्यान देहूला भेट देऊन श्री संत तुकाराम महाराज जन्मस्थान मंदिरात दर्शन घेतले होते.

त्यावेळी या मंदिराच्या जीर्णोद्धाराची गरज व्यक्त करत विकास करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. आता अर्थसंकल्पात अधिकृत घोषणा करून त्यांनी वारकरी संप्रदायाची दीर्घकालीन मागणी पूर्ण केल्याची भावना व्यक्त होत आहे.

# चिंचवडमध्ये उभारणार 'अजितसृष्टी'

## अजितदादांच्या कामांचा भव्य स्मारक प्रकल्प

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने चिंचवड येथे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भव्य अजितसृष्टी उभारण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याशी चर्चा करून त्यांच्या संकल्पनेनुसार ती सृष्टी निर्माण केली जाईल, असे सांगून पिंपरी-चिंचवड शहरासाठी अजितदादांचे मोठे योगदान असून, ते कोणी नाकारू शकत नाही, असे महापौर रवी लांडगे यांनी शुक्रवारी (दि. 6) स्पष्ट केले. महापौर पदाचा महिन्याभराचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानिमित्त ते पत्रकारांशी बोलत होते. या वेळी उपमहापौर शर्मिला बाबर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते. महापौर लांडगे म्हणाले की, अजितसृष्टी निर्माण करण्याबाबत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासोबत बैठक घेऊन चर्चा करण्यात येणार आहे. त्यांच्या संकल्पनेनुसार ती भव्य अजितसृष्टी असेल. त्यात अजितदादांनी शहरात केलेल्या विकासकामांचे दर्शन घडविले जाईल. त्यानुसार, अजितसृष्टी बनविण्याचा तसेच, सभागृहात अजितदादांचे तैलचित्र लावण्याचा ठराव करण्यात येईल. अजितसृष्टीबाबत सन 2026-27 च्या अर्थसंकल्पात अद्याप स्वतंत्र तरतूद करण्यात आलेली नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. शहरासाठी पाणीप्रश्न गंभीर आहे. भामा-आसखेड पाणी योजना लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी निष्क्रीय ठेकेदाराकडून काम काढून घेतले असून, उर्वरित कामांसाठी निविदाप्रक्रिया राबविण्यात येत आहे. तो प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहराला 167 एमएलडी अतिरिक्त स्वच्छ पाणी मिळणार आहे.

# पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकला मिळणार गती

*अर्थसंकल्पात सुमारे ५१०० कोटी रुपयांची तरतूद; खासदार श्रीरंग बारणे यांच्या पाठपुराव्याला यश*

पिंपरी (दै. संध्या) :






पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकला आता गती मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकसाठी 5100 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामुळे खासदार श्रीरंग बारणे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून ट्रॅकचे काम लवकरच सुरु होईल. ट्रॅक पूर्ण झाल्यानंतर लोकल वेळेत धावतील. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होणार नाही. वेळेत कार्यालय, महाविद्यालयात जाता येईल, असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला. केंद्र सरकारने 2014-15 मध्ये पुणे-लोणावळा लोहमार्गावरील तिसरा आणि चौथ्या ट्रॅक करण्याची घोषणा केली. त्याचा विकास आराखडा (डीपीआर) तयार केला. त्यासाठी 2017 मध्ये केंद्रीय अर्थसंकल्पात तरतूद देखील केली. परंतु, डीपीआर तयार करताना त्याचा खर्च 2100 कोटी होता. 2022 मध्ये खर्च 2200 कोटी रुपयांवर गेला. आता साडेसात हजार कोटी रुपयांपर्यंत तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकचा खर्च गेला आहे. त्यात जागा भूसंपादनासह सर्व कामाचा समावेश आहे. याचा 50 टक्के खर्च केंद्रीय रेल्वे विभाग आणि 50 टक्के राज्य सरकार अशी खर्चाची विभागणी आहे. राज्याच्या 50 टक्यांमध्ये पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेचा सहभाग राहणार आहे. हे काम मार्गी लावण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे यांनी सातत्याने तत्कालीन राज्य सरकारकडे पाठपुरावा केला. परंतु, सरकारने ठोस भूमिका घेतली नाही. 50 टक्क्यांच्या हिस्सा दिला नाही. त्यामुळे प्रकल्प रखडला होता. शिवसेनेचे मुख्य नेते, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर खासदार बारणे यांनी शिंदे यांच्यासह तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सतत बैठका घेतल्या. तत्कालीन मुख्यमंत्री शिंदे यांनी दोनवेळा बैठक घेऊन माहिती घेतली. हा प्रकल्प महारेल की केंद्र सरकार करणार यामध्ये रखडला. त्यानंतर पुन्हा खासदार बारणे यांच्या पाठपुराव्याने मुख्यमंत्री शिंदे यांनी बैठक घेतली. तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासोबत बैठक घेतली होती. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पात तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकसाठी 5100 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यामुळे तिसरा, चौथा ट्रॅक मार्गी लागणार आहे. तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेचे काम पूर्ण झाल्यानंतर पुणे, पिंपरी-चिंचवडहून मुंबईला जाणा-या प्रवाशांसाठी अधिकच्या गाड्यांची सुविधा उपलब्ध होईल.

# शिक्षणावरील निधी कपातीवर शरद पवार राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसची टीका

## ८२ टक्के शिष्यवृत्तीत कपात म्हणजे विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ – प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे

पिंपरी (दै. संध्या) :






महाराष्ट्राच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्रातील विविध शिष्यवृत्ती आणि विद्यार्थी सहाय्य योजनांमध्ये करण्यात आलेल्या कपातीवर राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस (शरदचंद्र पवार) महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे यांनी तीव्र टीका केली आहे. सरकारने शिक्षण क्षेत्रातील महत्त्वाच्या योजनांचा निधी कमी करून विद्यार्थ्यांच्या भविष्यावर घाला घातल्याचा आरोप त्यांनी केला. गव्हाणे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा निधी सुमारे ८२ टक्क्यांनी कमी करण्यात आला आहे. २०२५-२६ मध्ये या योजनेसाठी १८२१ कोटींची तरतूद होती; मात्र २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात ती केवळ ३२२ कोटींवर आणण्यात आली आहे. महाडीबीटी पोर्टलद्वारे दिल्या जाणाऱ्या या शिष्यवृत्तीचा लाभ राज्यातील हजारो आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना मिळत असल्याने ही कपात अत्यंत चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच तांत्रिक शिक्षणासाठी असलेला निधीही १६८१ कोटींवरून ३२२ कोटींवर आणण्यात आल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. कायदा आणि शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांसाठी असलेला १४० कोटींचा निधी पूर्णपणे बंद करण्यात आल्याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली.

उच्च व तांत्रिक शिक्षण विभागासाठी करण्यात आलेली १५६०४ कोटींची तरतूदही मागील वर्षाच्या तुलनेत कमी असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह भत्ता योजना या महत्त्वाच्या योजनेतील निधी ४६५ कोटींवरून २६६ कोटींवर आणण्यात आला असून, यामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांवर परिणाम होणार असल्याचे त्यांनी म्हटले. परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती योजनेतील निधी ४० कोटींवरून १५ कोटींवर कमी करण्यात आला असून सरकारी महाविद्यालयांसाठीचा खर्च ५०० कोटींवरून ३४८ कोटींवर आणण्यात आल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले. तसेच गैर-सरकारी शिक्षण संस्थांना दिल्या जाणाऱ्या अनुदानात आणि विद्यापीठांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीतही कपात करण्यात आल्याचा त्यांनी आरोप केला. दरम्यान, शालेय शिक्षण विभागासाठीचा निधी वाढविण्यात आला असला तरी त्यामध्ये महसुली खर्च वाढवून भांडवली खर्च कमी करण्यात आल्याचे गव्हाणे यांनी नमूद केले. यामुळे शाळांच्या पायाभूत सुविधांच्या विकासावर परिणाम होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या तोंडाला पाने पुसणारा हा अर्थसंकल्प असून विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात ढकलणारा आहे. सामाजिक न्यायाची भूमिका सरकार विसरले आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दूर करत त्यांना धार्मिक, जातीय आणि सामाजिक द्वेषात अडकवून आपले राजकीय हेतू साध्य करण्याचा सरकारचा हा डाव आहे. आपल्या व्यावसायिक मित्रांना मदत आणि त्यासाठी धार्मिक ध्रुवीकरण एवढाच या सरकारचा विचार आहे.

राज्य सरकारने शिक्षण क्षेत्रातील या कपातीचा पुनर्विचार करावा आणि विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्ती व सहाय्य योजनांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसतर्फे करण्यात आली आहे. अन्यथा विद्यार्थ्यांच्या हितासाठी राज्यभर आंदोलन करण्याचा इशाराही गव्हाणे यांनी दिला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### नारायणगाव महाविद्यालयात दोन दिवसीय 'सायन्स फेस्ट' उत्साहात संपन्न

नारायणगाव (दैनिक संध्या) : ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव येथे ५ व ६ मार्च रोजी सायन्स असोसिएशनच्या वतीने 'सायन्स फेस्ट' मोठ्या उत्साहात पार पडला. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी विज्ञानातील विविध प्रयोग आणि कलाकृती सादर केल्या. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड आणि कुतूहल निर्माण व्हावे, या उद्देशाने पोस्टर प्रेझेंटेशन, मॉडेल्स (प्रकल्प) आणि सायंटिफिक रांगोळी अशा स्पर्धा घेण्यात आल्या. या दोन दिवसीय कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला. उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. या प्रसंगी सायन्स समन्वयक प्रा. रसूल जमादार, डॉ. अशोक कानडे, प्रा. सुभाष कुडेकर, प्रा. समीर शेख, प्रा. शंतनु ठाकरे,प्रा. गाजुलवार, आणि प्रा. आकाश कांबळे यांच्यासह सर्व विभागांचे प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सायन्स असोसिएशनच्या अध्यक्षा प्रा.कविता सोनावणे यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. अपर्णा ढेपे यांनी केले. आभार प्रा. मयुरी डगळे यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. कांबळे, प्रा. रेश्मा शेख आणि प्रा. वाजगे यांनी केले होते.



### पुरंदर तालुक्यातील नीरेचा अभिमान; आदित्य सूर्यवंशी यांची PSI पदासाठी निवड

नीरा (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील नीरा गावासाठी अभिमानाची गोष्ट घडली असून गावातील आदित्य संतोष सूर्यवंशी यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेतून पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदासाठी निवड झाली आहे. त्यांच्या या यशामुळे नीरा शहराची मान उंचावली असून गावासह परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. निवडीची बातमी समजताच नीरा बाजारपेठेत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. हलगी-ताशांच्या गजरात, फटाक्यांची आतषबाजी आणि गुलालाची उधळण करत आदित्य सूर्यवंशी यांची ग्रामस्थांकडून मिरवणूक काढण्यात आली. गावकऱ्यांनी त्यांचे जल्लोषात स्वागत करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. आदित्य सूर्यवंशी यांच्या आयुष्यातील प्रवास अत्यंत संघर्षमय राहिला आहे. ते इयत्ता पाचवीत असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर आई स्वाती सूर्यवंशी यांनी मोठ्या कष्टाने मुलगा-मुलीचे शिक्षण पूर्ण केले. आदित्य यांनी प्राथमिक शिक्षण नीरा येथील जिल्हा परिषद शाळेत, माध्यमिक शिक्षण महात्मा गांधी विद्यालयात पूर्ण केले. पुढे अकरावी-बारावीचे शिक्षण सोमेश्वर येथील महाविद्यालयात घेतले, तर पदवीचे शिक्षण पुण्यातील व्हीआयटी महाविद्यालयातून पूर्ण केले. लहानपणापासूनच शासकीय अधिकारी होण्याचे स्वप्न त्यांनी मनाशी बाळगले होते. कोणताही खासगी क्लास न लावता प्रतिकूल परिस्थितीत जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर आदित्य यांनी हे यश संपादन केले. गेली तीन वर्षे ते नीरा येथील राहत्या घरीच अभ्यास करत होते. सकाळ-संध्याकाळ व्यायाम आणि नियमित अभ्यासाच्या जोरावर त्यांनी दुसऱ्याच प्रयत्नात ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली.

### ग्रामीण विकासासाठी समर्पित नेतृत्व

नीरा (दैनिक संध्या) : ग्रामीण विकासासाठी काम करणारे नेतृत्व केवळ आश्वासनांवर नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीवर उभे असते. समाजातील सर्व घटकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाययोजना करणारे नेतृत्व आजच्या काळाची गरज आहे. अशाच सामाजिक बांधिलकी जपत काम करणाऱ्या सौ. रोहिणी संदीप कदम-ढोले (जिल्हा परिषद सदस्य, अध्यक्ष, एस.एम.के. फाउंडेशन, पुणे) यांनी पद नसतानाही अनेक उपक्रम राबवून समाजासाठी काम केले आहे. महिलांनी समाजाच्या विकासात नेतृत्वाची धुरा स्वीकारली तर परिवर्तनाचा वेग अधिक वाढतो, याचे उदाहरण म्हणजे सौ. रोहिणी कदम-ढोले. सातारा जिल्ह्यातील साध्या कुटुंबात वाढलेल्या रोहिणी यांनी शिक्षण आणि सामाजिक कार्य यांचा समतोल साधत समाजासाठी अनेक उपक्रम राबवले. शेतकऱ्यांसाठी पाणीपुरवठा योजना, आरोग्य शिबिरे, विद्यार्थ्यांना मदत, युवकांसाठी क्रीडा स्पर्धा आणि धार्मिक-सांस्कृतिक कामे अशा विविध माध्यमातून त्यांनी लोकांशी विश्वासाचे नाते निर्माण केले आहे. समाजासाठी काम करण्याची जिद्द आणि लोकांशी असलेले आत्मीय नाते यामुळे त्यांचे नेतृत्व ग्रामीण भागासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# पुणे जिल्हा परिषदेच्या दोन अभिनव उपक्रमांची राज्यभर अंमलबजावणी

## ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी इस्रो आणि नासा अभ्यासदौरा आणि एकल महिला सक्षमीकरण उपक्रमाला राज्य शासनाची मान्यता

**नाझरे सुपे (दै. संध्या)**

पुणे जिल्हा परिषदेने राबविलेल्या दोन महत्त्वपूर्ण उपक्रमांची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांची राज्यभर अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय अवकाश अभ्यासदौरा आणि एकल महिला सक्षमीकरण उपक्रम या दोन्ही योजनांचा समावेश राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात आला असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.




ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जिज्ञासा आणि मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा निर्माण करण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेने " इस्रो-नासा अभ्यासदौरा" हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील अवकाश संशोधन संस्थांना भेट देण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते.

या कार्यक्रमात भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) तसेच अमेरिकेतील नासा सारख्या अग्रगण्य संस्थांचा समावेश आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना अवकाश संशोधनाची प्रत्यक्ष ओळख, शास्त्रज्ञांशी संवाद साधण्याची संधी आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अनुभव मिळतो. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि संशोधन क्षेत्रात करिअर करण्याची प्रेरणा निर्माण होत आहे.

पुणे जिल्ह्यात या उपक्रमाला मिळालेल्या उल्लेखनीय यशामुळे महाराष्ट्र शासनाने हा उपक्रम राज्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्याच्या अर्थसंकल्पात मान्यता मिळालेला दुसरा महत्त्वाचा उपक्रम म्हणजे "एकल महिला सक्षमीकरण उपक्रम". ग्रामीण भागातील विधवा, परित्यक्ता किंवा कुटुंबाच्या आधाराशिवाय जीवन जगणाऱ्या महिलांची ओळख पटवून त्यांना विविध प्रकारची मदत उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

या अंतर्गत पुणे जिल्हा परिषदेकडून नियोजनबद्ध आणि संवेदनशील पद्धतीने महिलांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांशी जोडले जाते. त्यांना आरोग्यसेवा, उपजीविकेच्या संधी, सामाजिक सुरक्षा लाभ तसेच आर्थिक स्वावलंबनासाठी आवश्यक मार्गदर्शन दिले जाते. याशिवाय समाजात सन्मानाने आणि आत्मविश्वासाने जीवन जगण्यासाठी विविध शासकीय व सामाजिक सहाय्य यंत्रणांशी त्यांना जोडले जाते. हा उपक्रम अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला असून विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सातत्याने आढावा बैठकांचे आयोजन केले.

या उपक्रमांच्या राज्यस्तरीय विस्तारासाठी ३ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथिगृह येथे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक झाली होती. या बैठकीत या उपक्रमांचा राज्यभर विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला.

"पुणे जिल्हा परिषदेने सुरू केलेल्या या उपक्रमांनी स्थानिक प्रशासनाच्या नाविन्यपूर्ण कामाचा आदर्श निर्माण केला आहे. या मॉडेलच्या यशामुळे ते राज्यभर राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाची प्रेरणा मिळेल आणि एकल महिलांना सक्षम आधारव्यवस्था उपलब्ध होईल," असे शासनाकडून सांगण्यात आले.

**तळागाळातील प्रशासनाचा आदर्श**

या उपक्रमांचा राज्याच्या अर्थसंकल्पात समावेश होणे हे जिल्हास्तरावर होत असलेल्या नाविन्यपूर्ण प्रशासनाच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करणारे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाही समाजातील प्रत्यक्ष समस्यांवर प्रभावी उपाययोजना तयार करून व्यापक धोरणात्मक बदलांना दिशा देऊ शकतात, याचे हे उदाहरण ठरत आहे. या उपक्रमांचा राज्यभर विस्तार झाल्यास हजारो ग्रामीण विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाचा प्रेरणादायी अनुभव मिळेल, तर एकल महिलांना सन्मानपूर्वक आणि स्वावलंबी जीवन जगण्यासाठी संघटित आधारव्यवस्था उपलब्ध होणार आहे.

## कर्मचाऱ्यांना किमान वेतन न दिल्याची तक्रार

**आळंदी (दै. संध्या)**

आळंदी नगरपरिषद अंतर्गत ठेका पद्धतीने कार्यरत असलेल्या सुमारे ६५ कर्मचाऱ्यांना शासनाने अधिसूचित केलेले किमान वेतन तसेच इतर वैधानिक लाभ न दिल्याची तक्रार करण्यात आली असून याबाबत तात्काळ चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत आळंदी नगरपरिषदचे माजी कर्मचारी प्रसाद बोराटे यांनी पुणे जिल्ह्याचे कामगार उप आयुक्त निखिल वाळके यांना निवेदन सादर केले आहे. सादर केलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दिनांक १ एप्रिल २०२२ पासून आळंदी नगरपरिषदेत एका ठेकेदारामार्फत विविध विभागांमध्ये अंदाजे ६५ कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र संबंधित कर्मचाऱ्यांना शासनाने निश्चित केलेले किमान वेतन, घरभाडे भत्ता, बोनस, रजा वेतन तसेच इतर वैधानिक लाभ नियमितपणे व पूर्णपणे देण्यात आलेले नाहीत, असा आरोप करण्यात आला आहे. तसेच उपलब्ध वेतन नोंदी, उपस्थिती पत्रके तसेच भविष्यनिर्वाह निधी (PF) व कर्मचारी राज्य विमा (ESI) संदर्भातील कागदपत्रांमध्ये विसंगती आढळून येत असल्याने किमान वेतन अधिनियम १९४८, करार कामगार (नियमन व समाप्ती) अधिनियम १९७० तसेच वेतन भुगतान अधिनियम १९३६ यांसारख्या कामगार कायद्यांचे उल्लंघन झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित प्रकरणात तात्काळ प्रत्यक्ष स्थळ तपासणी करून आळंदी नगरपरिषद हा प्रमुख नियोक्ता व संबंधित ठेकेदार यांची संयुक्त कायदेशीर जबाबदारी निश्चित करावी. तसेच एप्रिल २०२२ पासून आजपर्यंतची किमान वेतन फरक रक्कम, घरभाडे भत्ता, बोनस, रजा वेतन व इतर सर्व वैधानिक देणी संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यासाठी आवश्यक कायदेशीर कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. "या प्रकरणाची सखोल चौकशी करून, ज्या ठिकाणी जाणीवपूर्वक कायदेभंग किंवा आर्थिक अनियमितता झाल्याचे आढळेल, तिथे संबंधित दोषींविरुद्ध कठोर दंडात्मक आणि फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी आग्रही मागणी आळंदी नगरपरिषदेचे माजी कर्मचारी प्रसाद सुभाष बोराटे यांनी निवेदनाद्वारे केली आहे."

# थकबाकी न भरल्यास नळ कनेक्शन कापणार



**नाझरे सुपे (दै. संध्या)**

सासवड नगरपरिषदेकडून घरपट्टी आणि पाणीपट्टी थकबाकी वसुलीसाठी कठोर मोहीम हाती घेण्यात आली आहे. २५ हजार रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या नागरिकांचे नळ कनेक्शन तोडण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे.

"शहराच्या विकासासाठी आणि नागरी सुविधा सुरळीत ठेवण्यासाठी कर भरणे आवश्यक आहे. त्यामुळे मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या सर्व नागरिकांनी त्वरित घरपट्टी व पाणीपट्टी भरून नगरपरिषदेस सहकार्य करावे," असे मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी सांगितले.

**मुख्य मुद्दे**

- २५ हजारांपेक्षा जास्त थकबाकीदारांचे नळ कनेक्शन तोडण्यास सुरुवात
- १ लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्यांची यादी तयार
- मोठ्या थकबाकीदारांची दुकाने सील करण्याची कारवाई
- कर न भरणाऱ्यांची नावे डिजिटल बोर्डवर झळकवली जाणार
- नागरिकांनी त्वरित थकबाकी भरावी, असे आवाहन

सासवड नगरपरिषदेकडून थकबाकीदारांविरोधात धडक मोहीम राबवली जात आहे. शहरातील सुमारे ४०० मालमत्ता धारकांची थकबाकी २५ हजार रुपयांपेक्षा अधिक असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यापैकी ६४ मालमत्ता धारकांची थकबाकी १ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे. यामुळे पालिकेने कठोर पावले उचलत नळ कनेक्शन बंद करण्यास सुरुवात केली आहे. नगरपालिकेचे कर्मचारी प्रत्यक्ष मैदानात उतरले असून थकबाकी वसुलीसाठी पाच विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. मोठ्या थकबाकीदारांविरोधात कारवाई करत दुकाने सील करण्याची प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. तसेच वारंवार सूचना देऊनही कर न भरणाऱ्या नागरिकांची नावे डिजिटल बोर्डवर झळकवून ती शहरातील मुख्य चौकात लावली जाणार आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी शनिवार आणि रविवारी देखील कर भरण्याची सुविधा सुरू ठेवण्यात आली आहे.

## शिवनेरीवर तिथीनुसार शिवजयंती मोठ्या उत्साहात संपन्न : मर्दानी खेळांच्या प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची जिंकली मने



**जुन्नर (दै. संध्या)**

किल्ले शिवनेरी (ता.जुन्नर) येथे तिथीनुसार शिवजयंती सोहळा मोठया उत्साहपूर्ण वातावरणात छत्रपती शिवाजी महाराज की जय ! जय भवानी , जय शिवाजी ! या घोषणाच्या निनादात व राज्य सभेच्या खासदार डॉ.मेघा कुलकर्णी यांचे प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. यावेळी शिवशंकर राजेंद्र स्वामी, व्याख्याते सुधीर गाडे, नगराध्यक्षा सुजाता काजळे, शिवनेरी स्मारक समितीचे अध्यक्ष हेमंत मावळे, कार्याध्यक्ष मधुकर काजळे, चिटणीस रमेश कर्पे, चंद्रहास श्रोत्री, संदीप धानापुने, गोविंद हिंगे यांसह मोठ्या संख्येने शिवभक्त व व्रतधारी उपस्थित. यावेळी आयोजित केलेल्या सभेत राज्य सभेच्या खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांनी" छत्रपती शिवरायांचे जन्मस्थळ असलेले किल्ले शिवनेरी हे प्रेरणास्थान आहे. व प्रत्येकाने भीतीचे व आळसपणाचे सावट झटकून या पवित्र मातीला वंदन करून प्रेरणा घेऊन वाटचाल करावी. छत्रपती शिवरायांनी स्वतःसाठी राज्याभिषेक केला नाही.ते स्वतः एक योगी म्हणून सिद्ध होते," असे प्रतिपादन केले. दरम्यान, तिथीनुसार शिवजयंती निमित्ताने सकाळी सात वाजता शिवशंकर राजेंद्र स्वामी यांच्या हस्ते गडदेवता शिवाई मातेस अभिषेक करण्यात आला. यावेळी शिवाई देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र भगत, बाजार समितीचे संचालक प्रकाश ताजने, सरपंच दत्तात्रेय ताजणे यांसह ग्रामस्थांनी मान्यवरांचे स्वागत केले. त्यानंतर श्री शिवाई माता मंदिर ते शिवजन्मस्थळ छबिना व पालखी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते.

# महिला सक्षमीकरणाचा 'पुणे पॅटर्न': परिवर्तनाची सक्षम वाटचाल



**रोहिणी ढवळे**
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे

महिला सक्षमीकरण हा केवळ घोषणांचा विषय नाही; तो सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक परिवर्तनाचा केंद्रबिंदू आहे. महिला दिनाच्या निमित्ताने 'पुणे पॅटर्न'कडे पाहिले, तर एक गोष्ट स्पष्ट जाणवते...समन्वय, सातत्य आणि स्थानिक गरजांनुसार आखलेले सुयोग्य नियोजन यामुळेच महिलांच्या आयुष्यात ठोस आणि दीर्घकालीन बदल घडू शकतात. परंपरा आणि प्रगती यांचा सुंदर संगम लाभलेल्या पुणे जिल्ह्याने महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात राज्यात आदर्श निर्माण केला आहे. राज्यातील सर्वाधिक म्हणजे तब्बल २२ हजार महिला बचत गट जिल्ह्यात कार्यरत आहेत. या बचत गटांच्या माध्यमातून हजारो महिलांनी आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारला आहे. लघुउद्योग, घरगुती उत्पादन, कृषी प्रक्रिया उद्योग आणि सेवा क्षेत्रातील व्यवसाय अशा विविध माध्यमांतून महिलांनी केवळ स्वतःचे उत्पन्न वाढवले नाही, तर कुटुंबाच्या आणि गावाच्या अर्थचक्रालाही गती दिली आहे.

पुणे जिल्हा ही संतांची, विचारांची आणि शौर्याची भूमी आहे. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या अध्यात्मिक वारशाने समाजमन घडवले; तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य संकल्पनेत स्त्रीशक्तीचा सन्मान अंतर्भूत होता. राजमाता जिजाऊ यांनी घडवलेल्या संस्कारांची परंपरा आजही प्रेरणादायी आहे. या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशातूनच महिला सन्मान आणि सक्षमीकरणाची बीजे रुजली आहेत. 'पुणे पॅटर्न'ची हीच खरी ताकद आहे. पुणे जिल्ह्यात महिला व बाल विकास विभागामार्फत विविध योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण, कौशल्यविकास प्रशिक्षणातून रोजगारनिर्मिती तसेच अंगणवाडी सेवांद्वारे पोषण आणि आरोग्य या सर्व बाबी एकत्रितपणे हाताळण्याचा प्रयत्न 'पुणे पॅटर्न'मध्ये दिसून येतो. विशेषतः ग्रामीण भागात स्वयं-सहायता बचत गटांनी महिलांना आर्थिक स्वावलंबनाची दिशा दिली आहे. सूक्ष्म वित्तपुरवठा, उत्पादन-विक्री साखळी, स्थानिक बाजारपेठांशी जोडणी आणि डिजिटल व्यवहारांचे प्रशिक्षण यामुळे महिलांनी छोट्या उद्योगांपासून सेवा क्षेत्रापर्यंत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. विविध गटांनी कृषी प्रक्रिया उद्योग, सेंद्रिय शेती, दुग्ध व्यवसाय आणि हस्तकला या क्षेत्रांत यशस्वी पावले टाकली आहेत.

याचबरोबर 'बेटी बचाओ, बेटी पढाओ', पोषण अभियान तसेच किशोरी विकास कार्यक्रमांद्वारे मुलींच्या शिक्षण आणि आरोग्यावर विशेष भर दिला जात आहे.

किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य तपासणी, रक्तक्षय निर्मूलन मोहीम आणि मार्गदर्शन शिबिरे यांमुळे आरोग्यविषयक जागरूकता वाढत आहे. 'पुणे पॅटर्न'चे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड, मुळशी, भोर आणि वेल्हा हे डोंगरी तालुके. या भागात आदिवासी समाजाचे बांधव मोठ्या संख्येने वास्तव्य करतात. या भागातील महिलांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी विविध शासकीय यंत्रणा परस्पर समन्वय ठेवून कार्यरत आहेत. ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था, बँका, उद्योग संस्था आणि स्थानिक प्रशासन यांच्यातील सहकार्यामुळे योजनांची प्रभावी अंमलबजावणी शक्य झाली आहे. महिला उद्योजिकांसाठी मार्गदर्शन, विपणन सहाय्य आणि प्रदर्शनांच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून देणे हीदेखील महत्त्वाची पायरी ठरली आहे.

महिला सक्षमीकरण म्हणजे केवळ आर्थिक प्रगती नव्हे, तर निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवणे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नेतृत्व निर्माण करणे आणि सामाजिक सन्मान मिळवून देणे होय. पुणे जिल्ह्यातील अनेक महिला सरपंच, उद्योजिका आणि सामाजिक कार्यकर्त्या या बदलाचे प्रतीक ठरल्या आहेत. आज गरज आहे ती या मॉडेलचा अधिक विस्तार करण्याची. डिजिटल साक्षरता, हरित उद्योजकता आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ प्रत्येक महिलांपर्यंत पोहोचवणे हे पुढील टप्प्यातील उद्दिष्ट आहे. महिला सक्षम झाल्यास कुटुंब सक्षम होते आणि कुटुंब सक्षम झाल्यास समाज सुदृढ होतो—हीच 'पुणे पॅटर्न'ची प्रेरणा आहे.

महिला दिन हा केवळ उत्सव नसून कृतीची नवी दिशा देणारा दिवस आहे. 'पुणे पॅटर्न'च्या माध्यमातून महिलांच्या सर्वांगीण विकासाची वाट अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे. बचत गट हे केवळ आर्थिक व्यवहारांचे व्यासपीठ नसून आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि सामूहिक निर्णयक्षमतेची शाळा ठरत आहेत. ग्रामीण भागातील अनेक महिला आज ग्रामसभा, स्थानिक स्वराज्य संस्था आणि विविध विकास समित्यांमध्ये ठामपणे आपले मत मांडताना दिसतात. महिलांना केवळ मदत करण्यापेक्षा त्यांना सक्षम बनवणे हीच खरी सक्षमीकरणाची प्रक्रिया आहे. आज पुणे जिल्ह्यातील महिला केवळ घराच्या चौकटीत मर्यादित न राहता शिक्षण, उद्योग, सामाजिक कार्य आणि प्रशासन या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. शासनाच्या विविध योजनांचा प्रभावी वापर, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग आणि स्थानिक नेतृत्वाचा पाठिंबा यामुळे 'पुणे पॅटर्न' अधिक परिणामकारक ठरला आहे. महिला दिन हा केवळ गौरवाचा दिवस नसून पुढील वाटचालीचा संकल्प करण्याचा क्षण आहे. महिला सक्षमीकरणाच्या या सक्षम वाटचालीतून 'पुणे पॅटर्न' राज्यासाठीच नव्हे, तर देशासाठीही प्रेरणादायी ठरत आहे. महिलांचा सन्मान, स्वावलंबन आणि नेतृत्व यांवर आधारलेले हे परिवर्तन अधिक व्यापक करण्याची हीच योग्य वेळ आहे.

महिला व बालविकास विभागामार्फत महिला व बालकांच्या हक्काचे संरक्षण करण्यासोबतच विविध लोककल्याणकारी योजना तसेच सामाजिक कायद्याची अंमलबजावणी करण्यात येते. समाजातील गरजू , संकटग्रस्त महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी विभाग कटिबद्ध आहे. अधिक माहितीसाठी १०९१ आणि १०९८ या टोलफ्री क्रमांक तसेच जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.



# आईने मुलाला समानतेची दीक्षा देण्याचा दिवस

**8 मार्च जागतिक महिला दिन. हा केवळ साजरा करण्याचा दिवस नाही, तर आत्मपरीक्षणाचा, नव्या संकल्पांचा आणि पुढच्या पिढीसमोर नवा आदर्श ठेवण्याचा दिवस आहे. समाज परिवर्तनाच्या वाटचालीत स्त्री-पुरुष समानतेचा विचार हा केवळ घोषवाक्य न राहता तो घराघरात कृतीत उतरला पाहिजे. त्यासाठी पुरुषांच्या तुलनेत महिलांनी काकणभर पुढे सहभाग नोंदवला पाहिजे. त्यासाठी आपापल्या घरातील मुलींना नव्हे मुलांना लिंग समानतेचा संदेश देण्याची, आजची खरी गरज आहे.राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण, गृह, सामाजिक न्याय, आरोग्य, शिक्षण, क्रीडा व जवळपास सर्वच विभागामार्फत महिला सक्षमीकरणाच्या विविध योजना व धोरण राबवले जाते. राज्य महिला आयोगही स्वतंत्रपणे काम करते. मात्र शासनासोबतच समानतेच्या शिक्षणाची घराघरात प्रभावी अंमलबजावणीची आवश्यकता आहे.**

■ प्रवीण टाके ■
उपसंचालक विभागीय
माहिती कार्यालय, कोल्हापूर
9702858777

भारतीय समाजाने परंपरांचा वारसा जपला आहे; या परंपरांमध्ये पितृसत्ताक विचारांचा पगडा अद्यापही दिसून येतो. घरामध्ये मुलगा आणि मुलगी यांना समान संधी, वागणूक आणि प्रोत्साहन मिळणे अजूनही सर्व स्तरांवर पूर्णत्वास गेलेले नाही. मुलाने कसे वागावे, मुलीने कसे वागावे, कोणते कपडे योग्य आणि कोणते अयोग्य, अशा अनेक पूर्वग्रहांनी अजूनही अनेक घरांची दारे बंदिस्त आहेत. या बंद दारांना उघडण्याची किल्ली म्हणजे शिक्षण,संवाद आणि आधुनिक दृष्टिकोन. आजच्या नवशिक्षित व अशिक्षित मातांनीही नव्या समाज निर्मितीसाठी आपले हे दायित्व समजून घेणे म्हणजे महिला दिन साजरे करणे होय. लहानपणापासूनच मुलांना ‘हे मुलांचे काम, हे मुलींचे काम’ असे शिकवले तर त्यांच्या मनावर लिंगभेदाचे ठसे उमटतात. यामुळेच आपल्यापेक्षा वयस्क आईला पिण्याचे पाणी हातात मागणारी,जेवणाचे ताट धुवायला लावणारी,आंघोळीनंतर स्वत:ची चड्डी बनियनही धुवायला लावणारी पिढी अजूनही अस्तित्वात आहे. एकीकडे ‘स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी’ म्हणायचे आणि स्वतःचे ताट आईला धुवायला लावायचे. यामध्ये सर्वात वाईट म्हणजे आईने म्हातारपणाची काठी म्हणून धन्यता मानायची, ही संस्कृती आपल्यातला लिंगभेद कधीही नष्ट करणार नाही. त्यामुळे मुलगा असो की मुलगी लहानपणापासूनच घरकाम, खेळ, बालसंगोपन, आई-वडिलांच्या म्हातारपणाची जबाबदारी , आर्थिक निर्णयप्रक्रिया यामध्ये समान सहभागाची सवय लावणे गरजेचे आहे. किंबहुना घरातील वडिलांनी याबाबत आदर्श पुढे ठेवणे गरजेचे आहे.

सहशिक्षण आणि परस्पर आदराची जाणीव ही समतेची पहिली पायरी आहे. शाळा आणि घर या दोन्ही ठिकाणी ‘आपली मैत्रीण ही कुणाची तरी बहीण आहे’ आणि ‘आपल्या बहिणीलाही मित्र असू शकतो’ ही सहज आणि सन्मानपूर्वक मान्यता देणे,ती मुलांमध्ये रुजविणे आवश्यक आहे. एवढेच नव्हे तर स्त्री व पुरुष या लिंगासोबत एक तृतीय लिंगी समाज आपल्याच घरातून तयार होतो. अशा मुलांना, मुलगा किंवा मुलगी म्हणून नैसर्गिक बदलानुसार जगण्याचे स्वातंत्र्य आहे. अशा तृतीय पंथीयांना देखील सन्मानाने जगण्याचा तुमच्या सारखाच अधिकार आहे, ही जाणीव मुलांना लहाणपणीच होणे आवश्यक आहे. ही जाणीव मुलांना संवेदनशील आणि जबाबदार नागरिक बनवते.

वयात येणे ही प्रत्येक मुलगा आणि मुलगी यांच्या आयुष्यातील नैसर्गिक प्रक्रिया आहे. या विषयांवर घराघरांत मोकळेपणाने, वैज्ञानिक दृष्टीकोनातून चर्चा होणे आवश्यक आहे. लैंगिक शिक्षण ही संस्कृतीवरील घाला नसून नव्या विज्ञानवादी संस्कृतीची पायाभरणी आहे.माध्यमिक शिक्षणात प्रजनन आणि लैंगिक आरोग्याबाबत योग्य मार्गदर्शन मिळाल्यास गैरसमज, भीती आणि चुकीच्या समजुती दूर होऊ शकतात. अगदी लहान वयातच ‘गुड टच - बॅड टच’ याची माहिती मुलांना देणे हे त्यांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा शिक्षणामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि ते स्वतःचे रक्षण करण्यास सक्षम होतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतामध्ये घरात होणाऱ्या लैंगिक शोषणाला, नात्यात होणाऱ्या लैंगिक शोषणाला या छोट्याशा गोष्टीमुळे पायबंद बसू शकतो, हे लक्षात घेण्याचाही आजचा दिवस आहे.

घरामध्ये आईची भूमिका या परिवर्तनात अत्यंत महत्त्वाची ठरते. आई ही केवळ कुटुंबाची आधारवड नसून मूल्यांची पहिली शाळा असते. मुलगा आणि मुलगी यांच्यात कोणताही भेद न करता दोघांनाही समान प्रेम, समान शिस्त,

## जागतिक महिला दिन विशेष लेख

समान जाणीव आणि समान संधी देणे हे तिच्या हातात आहे. मुलांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे, मुलींना स्वतःचे मत मांडण्याचे स्वातंत्र्य देणे, महिलांप्रती मुलांमध्ये आदर निर्माण करणे, या कृतीतून समतेचा पाया मजबूत होतो. कुणाचीही बहिण असो, तिच्यासोबत कसे वागावे, याचे बाळकडून प्रत्येक घरातील आईनेच देणे महत्वाचे आहे. घरातून हा भेद नाकारला, घरातून त्यासाठी कृतीशील वस्तूपाठ अंमलात आला तर ‘निर्भया’ प्रकरणासारख्या घटना देशात घडणार नाही. या पायाभरणीची शपथ घेण्याचाही आजचा दिवस आहे. संपत्ती आणि वारसा या संदर्भातही समानतेची जाणीव रुजवणे आवश्यक आहे. 'बायकांना व्यवहारात ठेवू नये ', 'महिलांना व्यवहारातले काय कळते ', या पूर्वापार अंधश्रद्धांना दूर करण्याचाही आजचा दिवस आहे.

शेतीच्या काही गुंठ्यांसाठी सही करण्यापुरतीच बहिणीची भूमिका मर्यादित नाही, हे समजून घेतले पाहिजे. जमिनीच्या बाबत तिचे स्वप्न, तिची मेहनत आणि तिचे निर्णय यांनाही स्थान असायला हवे. लहानपणापासूनच मुलींना आर्थिक साक्षरता, मालमत्तेची जाणीव आणि स्वावलंबनाचे शिक्षण देणे ही नव्या समाजव्यवस्थेची गरज आहे. यासाठी स्वतः आईने या समान हक्काची पेरणी लहानपणीच करण्याचा आजचा दिवस आहे.

कर्मकांड आणि रूढीपरंपरांमध्ये स्त्रियांच्या शुद्ध-अशुद्धतेच्या मान्यता आजही काही ठिकाणी आढळतात. परंतु नैसर्गिक शारीरिक प्रक्रिया ही कोणत्याही प्रकारे अपवित्रतेचे लक्षण नाही. देवाला जर काही अपवित्र वाटले असते तर त्यांनी ही क्रियाच निर्माण केली नसती.त्यामुळे शुद्ध अशुद्ध हा भेद कर्मकांडातूनच निर्माण झाला आहे.मासिक पाळी हा स्त्रीदेहाचा नैसर्गिक भाग आहे. यावर खुली चर्चा झाली पाहीजे. या काळात स्त्रियांना वेगळे ठेवणे, त्यांच्या हातचे अन्न न खाणे किंवा धार्मिक विधींमध्ये सहभागी होऊ न देणे या कालबाह्य समजुतींना आता तिलांजली देणे आवश्यक आहे. विज्ञाननिष्ठ, विवेकी आणि संवेदनशील दृष्टिकोन स्वीकारून अशा रूढींचा पुनर्विचार करणे हीच खरी संस्कृतीची प्रगती आहे. यातूनच आपली संस्कृती प्रगल्भ होईल. संस्कृती, धर्म, रुढी,परंपरांच्या नावाखाली ज्या घरांमध्ये हा अघोरी उच्छाद सुरू आहे, ती घरे सुसंस्कृत समजायची का यावर चिंतन करण्याचाही आजचा दिवस आहे.

सामाजिक व्यवहारातही समानतेची जाणीव महत्त्वाची आहे. मुलगी सासरी जाणे हीच एकमेव दिशा नसून घरजावई होणेही तितकेच सन्माननीय असू शकते, ही मानसिकता समाजात रुजवणे आवश्यक आहे. त्यामुळे जशी आपली मुलगी सासरी जाऊ शकते तसाच आपला मुलगा घर जावई जाऊ शकतो, हे सामाजिक सत्य बिंबविण्याचाही आज दिवस आहे.

कार्यालयातील महिलांच्या पेहरावावर किंवा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर उपरोधिक टिप्पणी करणे ही सवय थांबली पाहिजे. एखाद्या महिलेच्या पोशाखाबद्दल नकारात्मक प्रतिक्रिया देणे हे तिच्या व्यक्तिमत्त्वाचा अपमान तर आहेच, पण आपल्यातील समतेच्या शिक्षणातील उणीवही दर्शवते. परस्पर आदर आणि व्यावसायिकता ही आधुनिक समाजाची ओळख असली पाहिजे. आजच्या भारतात अशी परिस्थिती निर्माण व्हावी की अर्ध्या रात्री एकटा जाणारा मुलगा आणि एकटी जाणारी मुलगी, या दोघांच्या सुरक्षिततेत कोणताही फरक उरू नये. ही सुरक्षितता केवळ कायद्याने नव्हे, तर घराघरातल्या संस्कारांनी निर्माण होते. मुलगा आणि मुलगी यांच्यातील अंतर कमी करून, त्यांना समानतेचे आणि सहजीवनाचे मूल्य शिकवूनच हा बदल साध्य होईल.तो बदल साधण्यासाठी वचनबद्ध होण्याचा आजचा दिवस आहे.

जगातील अनेक देशांनी लिंग समानतेच्या दिशेने सातत्याने प्रयत्न केले आहेत. उदाहरणार्थ स्वीडन, नॉर्वे, फिनलँड या देशांमध्ये पालकत्व रजेचे धोरण स्त्री-पुरुष दोघांसाठी समान आहे. त्यामुळे मुलांची जबाबदारी केवळ आईची हा समज आपोआप कमी झाला. आइसलँड या देशाने समान कामासाठी समान वेतन हा कायदा कठोरपणे अंमलात आणला. न्यूझीलंडने राजकीय नेतृत्वात महिलांचा सक्रिय सहभाग वाढवून सामाजिक दृष्टिकोनात बदल घडवून आणला. पाश्चात्त्य देशांमध्ये लिंगभेदाची समस्या पूर्णतः संपली असे म्हणता येणार नाही; परंतु ती कमी निश्चित झाली आहे. यासाठी वयाला अनुरूप लैंगिक शिक्षण अनिवार्य आहे. त्यामुळे शरीर, भावना आणि परस्पर आदर याबाबत खुला संवाद निर्माण झाला. भारतीय घटनेनेही कलम 14 व 15 अन्वये लिंगभेद अमान्य केला आहे. 1908 मध्ये महिला कामगारांनी न्यूयार्कमध्ये समान हक्कासाठी लढा उभारला. त्यातूनच 1911 पासून आस्ट्रिया, डेन्मार्क, जर्मनीत महिला दिनाची सुरुवात झाली. संयुक्त राष्ट्राने 8 मार्च 1975 ला महिला दिनाला मान्यता दिली. असा हा दीर्घ प्रवास आहे. त्यामुळे हा उत्सवाचा दिवस असावाच पण हक्काच्या लढयाची त्यामध्ये जाणीवही असावी. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारू या... आपल्या घरात, आपल्या वागण्यात, आपल्या शब्दांत समतेचा संदेश कितपत दिसतो? जर हा संदेश अजून अपुरा असेल, तर आजपासून त्याची सुरुवात करू या. मुलांच्या मनात आदर, संवेदनशीलता आणि समानतेची बीजे पेरू या. कारण आजची मुलेच उद्याचा समाज घडवणार आहेत. त्यामुळे लिंगभेद विरहित समाज घडविण्याचा संकल्प करण्याचा आजचा दिवस आहे.

त्यामुळे आजचा महिला दिवस साजरा करताना स्वतःच्या स्वातंत्र्य समता आणि प्रगती सोबतच आपल्या घरातील मुलांना देखील या बदलाचे साक्षीदार बनविण्यासाठी स्वतः महिलांनी प्रयत्न करणे पुरुषांनी देखील ही बाब समजून घेणे औचित्यपूर्ण ठरणार आहे.

चला तर ! घराघरातील मुलांना लिंग समानतेचा संदेश आपल्या वागण्यातून आणि संस्कारांतून देऊया. हीच खरी महिला दिनाची सार्थकता ठरेल.



# महिला सक्षमच आहेत

## त्यांना पुढे जाऊ द्या



■ सौ. ज्योती नाळे ■
संपादिका दै. संध्या

**स्त्री ही सृष्टीची निर्माती आहे. तिच्या कर्तृत्वामुळेच कुटुंब, समाज आणि राष्ट्राचा पाया मजबूत राहतो. तरीही अनेक वर्षे महिलांना समाजात दुय्यम स्थान दिले गेले. पण आजचा काळ बदलला आहे. शिक्षण, कष्ट आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर महिला प्रत्येक क्षेत्रात आपले सामर्थ्य सिद्ध करत आहेत. त्यामुळे आजची गरज एकच आहे. महिलांना थांबवण्याची नाही, तर त्यांना पुढे जाण्याची संधी देण्याची.**

आज महिला घराच्या चौकटीत मर्यादित राहिलेल्या नाहीत. त्या शिक्षण, उद्योग, शेती, क्रीडा, विज्ञान, प्रशासन, कला अशा अनेक क्षेत्रांत यशस्वीपणे कार्य करत आहेत. घर सांभाळताना त्या समाजाच्या विकासातही महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. अनेक महिलांनी आपल्या जिद्दीच्या जोरावर मोठ्या अडचणींवर मात करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यामुळे महिलांच्या क्षमतेवर शंका घेण्याचे कोणतेही कारण उरलेले नाही.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. शिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो, निर्णय घेण्याची क्षमता वाढते आणि त्यांना स्वावलंबी बनण्याचा मार्ग मिळतो. आज ग्रामीण भागातील मुलीही शिक्षणाच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत प्रगती करत आहेत. डॉक्टर, अभियंता, शिक्षक, अधिकारी, उद्योजिका अशा अनेक भूमिका महिलांनी यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. तथापि, महिलांच्या प्रगतीच्या मार्गात अजूनही काही सामाजिक अडथळे आहेत. काही ठिकाणी मुलगा-मुलगी असा भेदभाव केला जातो. मुलींना स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची संधी कमी दिली जाते. अशा मानसिकतेत बदल होणे अत्यंत आवश्यक आहे. मुली आणि मुले यांना समान संधी दिली तरच समाजाचा खरा विकास होऊ शकतो.

महिलांना योग्य संधी आणि पाठिंबा मिळाला तर त्या कोणतेही ध्येय साध्य करू शकतात. अनेक महिलांनी आपल्या कर्तृत्वाने समाजासाठी आदर्श निर्माण केले आहेत. त्यामुळे महिलांच्या क्षमतेवर विश्वास ठेवणे आणि त्यांना पुढे जाण्यास प्रोत्साहन देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी पुरुषांची साथही तितकीच महत्त्वाची आहे. कुटुंबातील प्रत्येक सदस्याने महिलांना सन्मान देणे, त्यांच्या निर्णयांचा आदर करणे आणि त्यांच्या स्वप्नांना पाठिंबा देणे आवश्यक आहे. समानता आणि परस्पर सन्मान या मूल्यांवर समाज उभा राहिला तर महिलांची प्रगती अधिक वेगाने होईल.

महिला ही केवळ कुटुंबाची आधारस्तंभ नाही, तर ती समाजाच्या प्रगतीची शक्ती आहे. तिच्या कर्तृत्वामुळेच समाज अधिक सक्षम आणि समृद्ध बनतो. म्हणूनच महिलांना अडवण्यापेक्षा त्यांना प्रोत्साहन देणे, संधी देणे आणि त्यांच्या क्षमतेला योग्य दिशा देणे गरजेचे आहे.

महिला दिन हा केवळ उत्सव साजरा करण्याचा दिवस नाही, तर महिलांच्या सन्मानाचा आणि त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देणारा दिवस आहे. या निमित्ताने प्रत्येकाने एक संकल्प करायला हवा. महिलांना समान संधी देण्याचा, त्यांच्या स्वप्नांना बळ देण्याचा आणि त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्याचा.

कारण एक गोष्ट आज स्पष्ट झाली आहे. महिला सक्षमच आहेत; फक्त त्यांना पुढे जाऊ द्या.

# नारीशक्तीचा जागतिक प्रवास : समतेच्या स्वप्नाकडून सशक्तीकरणाच्या वास्तवाकडे



■ डॉ. राजेंद्र बगाटे ■
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

दरवर्षी ८ मार्च हा दिवस संपूर्ण जगभर ‘आंतरराष्ट्रीय महिला दिन’ म्हणून साजरा केला जातो. हा केवळ उत्सवाचा दिवस नाही, तर स्त्रीच्या संघर्षांचा, कर्तृत्वाचा, स्वाभिमानाचा आणि समतेच्या आकांक्षेचा इतिहास पुन्हा एकदा स्मरणात आणणारा आणि भविष्याच्या दिशेने नवी प्रेरणा देणारा दिवस आहे. १९व्या शतकाच्या अखेरीस आणि २०व्या शतकाच्या प्रारंभी औद्योगिक क्रांतीनंतर स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठू लागला. कामगार चळवळींमध्ये स्त्रियांनी समान वेतन, सुरक्षित कामाचे तास आणि मतदानाचा अधिकार यांसाठी संघर्ष सुरू केला. या संघर्षाचे संघटित रूप १९०८ मध्ये अमेरिकेत पाहायला मिळाले. पुढे १९१० मध्ये कोपनहेगन येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत जर्मन समाजवादी नेत्या क्लारा झेटकिन यांनी महिला दिन साजरा करण्याची कल्पना मांडली. १९११ पासून काही देशांत हा दिवस साजरा होऊ लागला आणि १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने अधिकृत मान्यता दिल्यानंतर त्याला जागतिक स्वरूप प्राप्त झाले. अशा ऐतिहासिक पार्श्वभूमीवर आजचा महिला दिन हा स्त्रीसमानतेच्या दीर्घ आणि खडतर प्रवासाचा प्रतीकात्मक टप्पा आहे.

भारतीय समाजरचनेत स्त्रीची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. प्राचीन काळात स्त्री ला देवी समान मानले गेले असले, तरी व्यवहारात स्त्रीला अनेक मर्यादा आणि बंधनांचा सामना करावा लागला. मध्ययुगीन काळात सामाजिक रूढी परंपरांनी स्त्रीच्या शिक्षणावर, स्वातंत्र्यावर आणि सहभागावर बंधने आणली गेली होती. तथापि, १९व्या शतकात समाजसुधारकांच्या चळवळींनी या परिस्थितीत परिवर्तन घडवून आणण्यास सुरुवात केली. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली; राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथेच्या उच्चाटनासाठी लढा दिला; पंडिता रमाबाई यांनी विधवाशिक्षणाचा प्रसार केला. या सुधारकांच्या प्रयत्नांमुळे स्त्रीसमानतेचा पाया घातला गेला. स्वातंत्र्यलढ्यातही स्त्रियांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सरोजिनी नायडू, कस्तुरबा गांधी, अरुणा आसफ अली यांसारख्या अनेक महिलांनी नेतृत्व, त्याग आणि धैर्याचे उदाहरण घालून दिले.

स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुष समानतेचा स्पष्ट उच्चार केला. भारतीय राज्यघटनेमधील कलम १४, १५ आणि १६ यांनी कायद्यापुढे समानता, लिंगाच्या आधारावर भेदभावास मनाई आणि समान संधीची हमी दिली. यामुळे स्त्रीच्या अधिकारांना संवैधानिक आधार मिळाला आहे. पुढील काळात स्त्रियांच्या संरक्षणासाठी आणि सशक्तीकरणासाठी अनेक कायदे व योजना राबविण्यात आल्या आहेत. स्त्रीहक्क कायदे, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, मातृत्व लाभ कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा इत्यादींनी स्त्रीसुरक्षेला बळ दिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणामुळे लाखो महिलांना राजकीय प्रक्रियेत थेट सहभागाची संधी मिळाली आहे. आज ग्रामपंचायतपासून संसदेपर्यंत महिलांचे प्रतिनिधित्व वाढताना दिसते; तरीही संख्यात्मक वाढीबरोबर गुणवत्तापूर्ण आणि प्रभावी सहभागाची आवश्यकता आहे. शिक्षण हा स्त्रीसशक्तीकरणाचा मूलाधार आहे. मागील काही दशकांत मुलींच्या शालेय प्रवेशदरात लक्षणीय वाढ झाली आहे. उच्चशिक्षणातही मुलींचे प्रमाण वाढत आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कायदा, कला आणि संशोधन या सर्व क्षेत्रांत महिलांनी आपली छाप पाडली आहे. विज्ञानक्षेत्रात कल्पना चावला यांचे अंतराळयात्रेतील योगदान प्रेरणादायी ठरले आहे; क्रीडा क्षेत्रात पी. व्ही. सिंधू, मेरी कोम यांनी जागतिक स्तरावर यश संपादन केले आहे; राजकारणात इंदिरा गांधी यांनी देशाचे नेतृत्व केले आहे. या उदाहरणांमधून स्त्रीच्या क्षमतेला योग्य संधी मिळाल्यास ती कोणतेही शिखर गाठू शकते, हे अधोरेखित होते. तथापि, प्रगतीच्या या वाटचालीत अनेक आव्हाने अजूनही कायम आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांच्या संधींमध्ये तफावत दिसून येते. काही ठिकाणी मुलींचे शिक्षण माध्यमिक स्तरानंतर खंडित होते. लवकर लग्न, कुपोषण, आरोग्यसेवेची अपुरी उपलब्धता, लैंगिक भेदभाव, कौटुंबिक हिंसा, मानवी तस्करी, कार्यस्थळी छळ, वेतनातील असमानता अशी विविध स्वरूपे स्त्रीच्या विकासाला अडथळा निर्माण करतात. डिजिटल युगातही महिलांचा तंत्रज्ञानातील सहभाग तुलनेने कमी आहे. सायबर छळासारख्या नव्या समस्या उभ्या राहत आहेत. म्हणूनच महिला दिन हा केवळ गौरवाचा नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवसही आहे. आर्थिक सशक्तीकरण हा स्त्रीच्या स्वावलंबनाचा कणा आहे. स्वयंसहायता बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांनी बचत, सूक्ष्म वित्त आणि लघुउद्योगाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. हस्तकला, शेतीपूरक व्यवसाय, दुग्धव्यवसाय, खाद्यप्रक्रिया उद्योग अशा विविध उपक्रमांत महिलांचा सहभाग वाढत आहे. शहरी भागात उद्योजकतेकडे महिलांचा कल वाढत असून स्टार्टअप संस्कृतीतही त्या पुढे येत आहेत. मात्र, भांडवलाची उपलब्धता, बाजारपेठेचा विस्तार आणि कौशल्यविकास यांसाठी अधिक धोरणात्मक पाठबळ आवश्यक आहे. समान वेतनाची अंमलबजावणी आणि कार्यस्थळी सुरक्षित वातावरणाची हमी देणे ही शासन व समाज दोघांची जबाबदारी आहे. सामाजिक-सांस्कृतिक स्तरावर स्त्रीची प्रतिमा बदलण्याची गरज आहे. माध्यमांमध्ये स्त्रीचे वस्तुकरण टाळणे, मुलगा मुलगी भेदभाव नष्ट करणे, घरगुती जबाबदाऱ्या समसमान वाटून घेणे, पालकत्वाची जबाबदारी दोघांनी स्वीकारणे या मूल्यांचा प्रसार झाला पाहिजे. लिंगसंवेदनशील शिक्षण आणि समाजीकरणामुळे पुढील पिढी अधिक समताधिष्ठित विचार स्वीकारू शकेल. महिला दिनानिमित्त शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि शासन विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात; परंतु या उपक्रमांचा परिणाम वर्षभर टिकणारा असणे महत्त्वाचे आहे.

आजच्या काळात स्त्री नेतृत्वाचे विविध आयाम दिसून येतात. प्रशासन, न्यायव्यवस्था, विज्ञान-तंत्रज्ञान, संरक्षण, कला, साहित्य, माध्यमे अशा सर्व क्षेत्रांत महिलांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. ग्रामीण भागातील महिला सरपंचांनी गावविकासाची दिशा बदलली आहे; स्वयंसेवी क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी सामाजिक परिवर्तन घडवून आणले आहे; संशोधक महिलांनी नवकल्पना साकारल्या आहेत. या सर्व उदाहरणांमुळे स्त्रीशक्तीचे व्यापक आणि बहुआयामी स्वरूप स्पष्ट होते. मात्र, प्रतिनिधित्वाची संधी सर्व स्तरांपर्यंत पोहोचावी, यासाठी संरचनात्मक अडथळे दूर करणे आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवरही महिला सशक्तीकरण हा विकासाचा प्रमुख अजेंडा ठरला आहे. लिंगसमानता ही शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी एक महत्त्वाची संकल्पना आहे. शिक्षण, आरोग्य, आर्थिक संधी, राजकीय सहभाग आणि हिंसामुक्त जीवन या सर्व घटकांचा समावेश लिंगभाव न्यायात होतो. महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येक देश आपापल्या प्रगतीचा आढावा घेतो आणि उर्वरित अंतर भरून काढण्यासाठी धोरणे आखतो. भारतानेही ‘बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ’, ‘उज्वला’, ‘सुकन्या समृद्धी’ यांसारख्या योजनांद्वारे मुलींच्या सक्षमीकरणाचा प्रयत्न केला आहे; परंतु या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृती तितकीच गरजेची आहे.

स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्न केवळ महिलांचा नसून संपूर्ण समाजाच्या प्रगतीशी निगडित आहे. ज्या समाजात स्त्रीला सन्मान, सुरक्षा आणि संधी मिळतात, तो समाज अधिक सर्जनशील, समताधिष्ठित आणि प्रगतिशील बनतो. घर, शाळा, कार्यक्षेत्र आणि सार्वजनिक जीवन या सर्व स्तरांवर लिंगसमानतेची जाणीव रुजवणे आवश्यक आहे. पुरुषांनीही या परिवर्तन प्रक्रियेत सक्रिय सहभागी होणे गरजेचे आहे. कारण समानतेची लढाई ही परस्पर विरोधाची नसून सहकार्याची आहे. महिला दिन आपल्याला भूतकाळातील संघर्षांची आठवण करून देतो, वर्तमानातील यशाचा गौरव करतो आणि भविष्याच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देतो. आज घोषणांपेक्षा कृतीची, प्रतीकात्मक सन्मानापेक्षा वास्तविक संधींची आणि तात्पुरत्या उत्साहापेक्षा सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज आहे. प्रत्येक मुलीला गुणवत्तापूर्ण शिक्षण, सुरक्षित वातावरण, आरोग्यसेवा आणि स्वप्नपूर्तीची संधी मिळाली पाहिजे. प्रत्येक महिलेला निर्णयप्रक्रियेत स्थान, आर्थिक स्वावलंबन आणि सन्माननीय आयुष्याचा अधिकार मिळाला पाहिजे.

८ मार्चचा दिवस हा केवळ दिनदर्शिकेतील एक तारीख नसून समाजपरिवर्तनाची प्रेरणा आहे. स्त्रीच्या कर्तृत्वाला मान्यता देताना तिच्या वेदनांना आणि संघर्षांना विसरून चालणार नाही. समतेचे स्वप्न साकार करण्यासाठी शासन, समाज आणि कुटुंब या तिन्ही स्तरांवर एकात्मिक प्रयत्नांची गरज आहे. नारीशक्तीचा सन्मान, संरक्षण आणि सशक्तीकरण हीच खरी प्रगतीची गुरुकिल्ली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### उद्योजकता विकासाद्वारे महिलांनी आत्मनिर्भर व्हावे - स्मिता धुमाळ

■ जागतिक महिला दिनानिमित्ताने यशस्वी संस्थेच्यावतीने उद्योजिका-व्यावसायिक महिलांचा सत्कार सोहळा संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : कौशल्य विकास प्रशिक्षण केल्यानंतर उद्योजकता विकासाद्वारे महिलांनी आत्मनिर्भर व्हावे,असे मत यशस्वी एकेडमी फॉर स्किल्सच्या संचालिका स्मिता धुमाळ यांनी व्यक्त केले. त्या आज पुणे येथील यशस्वी संस्थेच्या मुख्यालयात जागतिक महिला दिनानिमित्ताने आयोजित उद्योजिका-व्यावसायिक महिलांच्या सत्कार सोहळ्यात बोलत होत्या. यावेळी त्या म्हणाल्या की, महिलांनी उद्योग-व्यवसाय क्षेत्रात कार्यरत असताना कुटुंबातील सदस्यांना देखील सामावून घ्यावे, जेणेकरून वर्क लाईफ बॅलन्स सुरळीत राहून आपण व्यवसायांच्या गुणवत्तेवर व प्रगती करण्याकडे आपल्याला लक्ष देता येईल.यावेळी स्मिता धुमाळ यांनी त्यांच्या करिअरच्या वाटचालीचा प्रवास सांगत विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रातिनिधिक स्वरूपात काही विद्यार्थिनींनी त्यांच्या उद्योजकतेच्या प्रवासाबद्दल मनोगते विशद केली.याप्रसंगी कौशल्य विकास प्रशिक्षण पूर्ण करून उद्योजक- व्यावसायिक प्रवास सुरु केलेल्या विद्यार्थिनींना प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अमृता तेंडुलकर यांनी केले.या कार्यक्रमाला यशस्वी संस्थेच्या प्रशिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होते.




### आळे येथे व्याख्यानमालेची उत्साहात सुरुवात

नारायणगाव (दैनिक संध्या) : आजच्या विद्यार्थ्यांना शिक्षण, करिअर,मैत्री संबंध तसेच वैयक्तिक समस्यांना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत योग्य समुपदेशन मिळाल्यासअनेक समस्या सोडविता येतात. यासाठी व्याख्यानमालेचे पहिले पुष्प डॉ. स्वाती विनय गानू यांनी गुंफत 'कौन्सिलिंगच्या जगात' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जुन्नर तालुक्यातील आळे येथील ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाचे बाळासाहेब जाधव कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहि:शाल मंडळ व जेष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष यांच्या संयुक्त विद्यामाने शैक्षणिक वर्ष 2025- 26 अंतर्गत तीन दिवसीय 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर' व्याख्यानमाला उत्साहात सुरू झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.प्रवीण जाधव यांनी केले. इतिहास विभाग प्रमुख डॉ. अरुण रवींद्र वाघोले यांनी व्याख्यानमालेचे आयोजन केले. मानद सचिव डॉ.अर्जुन पाडेकर यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेजर डॉ.सुषमा कदम यांनी केले. प्रा. डॉ. सविता रहांगडाले यांनी पाहुण्यांच्या परिचय करून दिला. तर आभार प्रदर्शन डॉ. अरुणा वाघोले यांनी मानले.

### इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्यास ग्राहकांचा विरोध

नारायणगाव (दैनिक संध्या) : महावितरण कंपनीकडून वीज वापरासाठी प्रिपेड मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येणार असल्याची माहिती मिळताच खेडोपाड्यातील ग्राहकांमध्ये विरोधाचा सुर उमटू लागला आहे. या निर्णयामुळे सर्वसामान्य ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक ताण येईल, अशी भीती नागरिकांमधून व्यक्त करण्यात येत आहे. प्रिपेड मीटर प्रणालीमध्ये ग्राहकांना मोबाईल रिचार्जप्रमाणे आधी पैसे भरून वीज वापरावी लागणार आहे. रिचार्ज संपल्यास विजपुरवठा तात्काळ खंडित होणार असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. विशेषतः शेतकरी लहान व्यवसायिक आणि सर्वसामान्य कुटुंबांना या पद्धतीमुळे अडचण निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ग्रामस्थांच्या मते सध्या सुरू असलेली पोस्टपेड पद्धत अधिक सोयीची असून महिन्याच्या शेवटी बिल भरता येते. त्यामुळे अचानक वीज बंद होण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. प्रिपेड मीटरमुळे मात्र आर्थिक अडचणीत असलेल्या कुटुंबांना वीज वापरात मर्यादा येऊ शकतात. महावितरणकडून या योजनेमुळे वीजबिल थकबाकी कमी होईल आणि वीज वापरावर नियंत्रण ठेवणे शक्य होईल, असा दावा करण्यात येत आहे. तसेच स्मार्ट मीटर बसवलेल्या ग्राहकांना बिलात 10 टक्के सवलत देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. सकाळी 9 ते सायंकाळी 5 या वेळेत वीज वापरल्यास प्रत्येक युनिटमागे 85 पैशांचा लाभ मिळणार आहे.

### कांद्याच्या बाजार भावाने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी : गजानन गांडेकर



नारायणगाव (दैनिक संध्या) : पश्चिम महाराष्ट्रामध्ये सध्या कांदा काढणीचे जोरात घाई झालेली आहे. प्रत्येक शेतकऱ्याला कांद्याचा पैसा चांगला मिळेल अशी मनस्वी भावना होती. परंतु कांद्याच्या बाजारभावाने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले. अशी भावना गजानन दांडेकर प्रवक्ते रयत क्रांती संघटना यांनी आपल्या तमाम शेतकऱ्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. कांदा लागवडीला लागणारा खर्च आणि कांद्याच्या उत्पादनापासून मिळणारा पैसा याचा कुठेही ताळमेळ बसत नाही. प्रत्येक वर्षी शेतकऱ्यांच्या मनात कांद्याला चांगला बाजार भाव मिळेल आणि शेतकऱ्याची परिस्थिती सुधारेल अशा भावनेने कांदा हा मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. परंतु अनेक वर्षापासून शेतकऱ्याला कांद्याला बाजारभाव मिळत नाही. बाजारभाव मिळण्यासाठी शासनाचे धोरण हे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या हिताचे नाही. त्या धोरणामुळे शेतकरी आज मेटा कुटीला आलेला आहे.केंद्र शासनाने कांदा निर्यात बंदी केल्याने शेतकऱ्याच्या मालाला बाजार भाव मिळत नाही. कांद्यातून चांगलं उत्पादन झाले. तर चांगली रक्कम हातात येईल. त्यामुळे घरच्या आणि इतर असणार अनेक बाबी भागवता येतील. परंतु गेल्या अनेक वर्षापासून कांद्याच्या बाजारभावाने तोंडाला पाणी पुसले जात आहे .त्यामुळे शेतकरी हवालदील झाला आहे.

# माहूर विद्यालयास ग्रंथालयासाठी पुस्तके व संगणक-प्रिंटर भेट




काळदरी (दै. संध्या)

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड संचलित माहूर माध्यमिक विद्यालय माहूर ता . पुरंदर जि . पुणे या विद्यालयास अक्षर लायब्ररी व एअर प्रोडक्ट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड , पुणे यांच्या वतीने ८० , ००० / - रू किमती ची अवांतर वाचनाची पुस्तके श्री अनिल चाचर व रामप्रभू पेटकर यांच्या माध्यमातून विद्यालयास मिळाली. स्थानिक विद्यालयाच्या ग्रंथालयाच्या विकासासाठी समाजातील दातृत्वाची परंपरा जपत उदार व्यक्तींनी पुस्तके तसेच न्यू इंडिया इंन्श्यूरन्स कंपनी च्या मॅनेजर सौ . मंजूश्री उपासनी यांनी १ संगणक व १ प्रिंटरची भेट देऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस मोठा हातभार लावला आहे या कामी विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमंत पवार यांच्या विशेष प्रयत्नामुळे मिळाले आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानासह वाचन संस्कृतीचा लाभ मिळणार आहे.

विद्यालयामध्ये भौतिक सुविधा अंतर्गत ग्रंथालय समृद्ध करण्यासाठी विविध विषयांवरील संदर्भग्रंथ, कथा-कादंबऱ्या, विज्ञान, इतिहास, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक पुस्तके तसेच शैक्षणिक साहित्य दान करण्यात आले. यासोबतच ग्रंथालयाच्या डिजिटल वापरासाठी संगणक व प्रिंटरची भेट देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यास साहित्य शोधणे, प्रकल्प तयार करणे, तसेच आवश्यक कागदपत्रे प्रिंट करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित छोटेखानी समारंभात विद्यालयाचे मुख्याध्यापक, श्री हनुमंत पवार सर्व शिक्षकवृंद, ग्रामस्थ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुस्तके, संगणक व प्रिंटर विद्यालयाच्या ग्रंथालयास सुपूर्द करण्यात आले. यावेळी बोलताना मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी वाचनाची सवय लावावी, आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून ज्ञान संपादन करावे, असे आवाहन केले. ग्रंथालय हे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाचे केंद्र असून या सुविधेमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाला निश्चितच चालना मिळेल, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाच्या वतीने दात्यांचे आभार मानण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यालयाचे ग्रंथालय अधिक समृद्ध होऊन विद्यार्थ्यांना ज्ञानसंपादनासाठी उत्तम वातावरण उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री महेंद्र भोसले यांनी तर आभार पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष श्री रामप्रभू पेटकर यांनी मानले.

## चाकणला भापसे सैनिकांचा ऐतिहासिक मेळावा संपन्न

चाकण (दै. संध्या)

चाकणला भापसे सैनिकांचा ऐतिहासिक मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला असून, लोकनेते दीपक भाऊ ताटे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनातून कार्यकर्त्यांना नवसंजीवनी मिळाली. शिवरायांच्या विचारांवर चालण्याचा निर्धार यावेळी भापसे सैनिकांनी केला. राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त भापसे पार्टीच्या वतीने चाकण येथे भापसे सैनिकांचा भव्य महामेळावा उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्याला राज्यातील विविध भागांतून भापसेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शिवरायांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांवर चालण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी केला. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी 'जय भवानी, जय शिवाजी'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. शिवरायांच्या शौर्यगाथा व स्वराज्य स्थापनेच्या कार्याची आठवण करून देत उपस्थितांनी त्यांचे विचार समाजात रुजवण्याचा संकल्प केला. लोकनेते दीपकभाऊ ताटे यांनी यावेळी सांगितले की, " छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आणि विचार आजच्या काळातही अत्यंत प्रेरणादायी आहेत. शिवरायांनी स्वराज्य उभारताना सर्वसामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवले होते. त्याच विचारांवर भापसेचे कार्यकर्ते समाजातील विविध प्रश्नांसाठी काम करत राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कोणतीही संघटना ही कार्यकर्त्यांच्या निष्ठा, कष्ट आणि एकजुटीवर उभी राहते. कार्यकर्त्यांनी गावागावांत जाऊन संघटनेचे विचार लोकांपर्यंत पोहोचवावेत. सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा आणि शिवरायांच्या आदर्शांवर चालत समाजसेवेचे कार्य अधिक जोमाने करावे." ताटे यांच्या या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे उपस्थित भापसे सैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. या महामेळाव्यात संघटनेच्या आगामी वाटचालीबाबत चर्चा करण्यात आली.

## खळद येथील श्री. शिवशंभो माध्यमिक विद्यालयात 'आनंदी शनिवार' निमित्त बाल आनंदी बाजार व खाऊ गल्ली उत्साहात

जेजुरी (दै. संध्या)



श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ,सासवड संचलित शिवशंभो माध्यमिक विद्यालय, खळद येथे 'आनंदी शनिवार' उपक्रमांतर्गत आठवडे बाजार व खाऊ गल्लीचे आकर्षक आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शेतकरी आणि विक्रेते बनून स्वतः तयार केलेले पदार्थ व शेतीमाल विक्रीसाठी आणला. त्यामुळे विद्यालयाचा परिसर अक्षरशः गावच्या मंडईसारखा गजबजून गेला.

या बाजारात विद्यार्थ्यांनी ओली भेळ, आप्पे, पाणीपुरी, व्हेज बिर्याणी, वडापाव, समोसे, तळलेली बॉबी, फुटाणे, भाजलेले शेंगदाणे, मेथी पराठे, चटणी, चाट, व्हेज मंचुरियन आदी विविध खाद्यपदार्थ तयार करून विक्रीसाठी मांडले होते. तसेच शेवगा, कोबी, पावटा, काकडी, चिंच, मक्याचे कणीस, कांदे, कढीपत्ता, कोथिंबीर, पुदिना, नारळ, वाल, घेवडा आणि पुरंदरचे प्रसिद्ध गोड अंजीर यांसारखा ताजा शेतीमालही विक्रीसाठी आणण्यात आला होता.

या बाल आनंद मेळाव्यात कार्तिकी कामथे हिचा गावरान पावटा, स्नेहल कादबाने हिची पाणीपुरी तसेच माऊली बालसंस्कार केंद्राचा शेजवान फ्राय राईस यांना विशेष मागणी होती. "भाजी घ्या, ताजी भाजी घ्या" अशा हाका देत विद्यार्थी आपल्या वस्तूंची विक्री करत होते. त्यामुळे विद्यालयाचा परिसर मंडईसारखा उत्साहपूर्ण झाला होता.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळावे, पैशाचे महत्त्व समजावे आणि व्यवहार कौशल्य विकसित व्हावे या उद्देशाने हा आनंदी बाजार आयोजित करण्यात आला. या बाजारातून सुमारे ८,५२५ रुपयांची उलाढाल झाली.

या कार्यक्रमास गावातील ग्रामस्थांनीही मोठ्या उत्साहाने भेट देत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. योगेश दादा कामथे, वारेश्वर कामथे, विकास कामथे, प्रकाश कामथे, काशिनाथ झेंडे, योगेश कामथे तसेच महिला पालक गंगाबाई भैरगोंड, सविता चव्हाण, सुनंदा पोमन, कोमल काकडे, योगिता कामथे, स्वाती कामथे, संगीता कामथे आणि यशश्री कामथे यांनी उपस्थित राहून खरेदी केली. तसेच आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या औचित्याने विद्यालयाच्या वतीने उपस्थित महिलांचे अभिनंदन करण्यात आले.

हा उपक्रम उपक्रमशील शिक्षक रमेश बोरावके यांच्या संकल्पनेतून आणि मुख्याध्यापक हरिभाऊ टापरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमासाठी शिक्षक दिलीप जगताप, प्रल्हाद कारकर, रामचंद्र कामठे, प्रकाश हांडे, सुस्मिता चव्हाण, सायली गोरे आणि उत्कर्षा फुले यांनी सहकार्य केले.

या मेळाव्यास जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खळद येथील शिक्षक व विद्यार्थ्यांनीही सदिच्छा भेट देऊन विविध पदार्थांचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छ करून स्वच्छतेची शपथ घेतली.

उपक्रम यशस्वी होण्यासाठी बाळासाहेब खळदकर, बाबुराव गायकवाड, वैजयंता मांढरे, प्रमोद यादव आदींनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांनी विक्री-खरेदीचा मनसोक्त आनंद घेतला असून असा बाल आनंद मेळावा दरवर्षी आयोजित करावा, अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

## सारा राष्ट्रीय स्पर्धेमध्ये चाकणमधील ५६ विद्यार्थी झळकले




चाकण (दै. संध्या)

आंतरराष्ट्रीय अबॅकस गणित महामंडळ भारत आणि तैवान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या सारा राष्ट्रीय स्पर्धेमध्ये चाकण मधील ५६ विद्यार्थी झळकले आहेत. चाकण येथील संतोष ऑल राऊंडर अकॅडमी आणि सारा अबॅकस अकॅडमी मधून अबॅकस, वैदिक गणित, सुंदर हस्ताक्षर, चित्रकला, रोबोटिक्स आणि फोनिक्स मधून संपूर्ण भारतातून चार हजार पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. सारा १८ व्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये ८४ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी ४१ विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्पर्धेच्या दुसऱ्या आणि फायनल राऊंडसाठी निवड होऊन त्यापैकी ३९ विद्यार्थी देशपातळीवर गटात विजेते झाले. तसेच १७ विद्यार्थी विभागीय विजेते झाले. सर्व विजेत्यांना जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲड. अशोक जाधव, प्रा. अमोल फुंदे, सेंट्रल बँक ऑफ इंडिया चाकण शाखेचे उपव्यवस्थापक इंद्रनील मोरे, संस्थेचे विश्वस्त भास्कर आव्हाड आदींच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. १०० गणितांची कठीण आणि क्लिष्ट उदाहरणे तीन आणि पाच मिनिटांमध्ये सोडवायचे असतात. चाकण येथील विद्यार्थ्यांचा सराव प्राचार्या अर्चना प्रवीण आघाव, सहशिक्षिका संध्या जाधव, कविता बोडके, पल्लवी पवार, स्वाती धबाले, रूपाली पाटील, अपर्णा जायले, कृणाली पाटील या शिक्षकांनी घेतला. या कौतुक सोहळ्यामध्ये विद्यार्थी, पालकांनी स्पर्धे विषयीचे अनुभव सांगितले. आंतरराष्ट्रीय अबॅकस गणित महामंडळाच्या अध्यक्षा व प्राचार्या अर्चना प्रवीण आघाव यांना राष्ट्रीय पातळीवरील बेस्ट टीचर अवॉर्ड २०२६, महामंडळाचे भारताचे प्रतिनिधी डॉ. प्रवीण आघाव यांना बेस्ट टीचर अवॉर्ड देण्यात आले.

## जावजीबुवाची वाडी येथे हरभरा पीक कापणी प्रयोग उत्साहात संपन्न


यवत (दै. संध्या)

दौंड तालुक्यातील जावजीबुवाची वाडी येथे रब्बी हंगाम सांख्यिकी पीक कापणी प्रयोगांतर्गत हरभरा पिकाची काढणी व वजन प्रक्रिया नुकतीच पार पडली. मा. उपविभागीय कृषी अधिकारी टी. के. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. शासनाच्या पीक कापणी प्रयोग योजनेद्वारे पिकाची उत्पादकता निश्चित केली जाते. याच अनुषंगाने जावजीबुवाची वाडी येथील दिपक चंद्रकांत जगदाळे यांच्या शेतात हरभरा पिकाची प्रत्यक्ष काढणी करण्यात आली. कापणीनंतर पिकाचे अचूक वजन करून उत्पादनाची नोंद घेण्यात आली. या प्रयोगातून आलेल्या आकडेवारीचा उपयोग पीक विम्याचे संरक्षण आणि उत्पादनाचा अंदाज वर्तवण्यासाठी केला जाणार आहे. या प्रसंगी उपविभागीय कृषी अधिकारी टी के चौधरी यांच्यासह उपकृषी अधिकारी संतोष मोरे, सहाय्यक कृषी अधिकारी विनायक जगताप, पंढरीनाथ कुतवळ, शैलेश मोरे, चंद्रकांत जगदाळे, दीपक जगदाळे आणि विमा कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. या प्रयोगामुळे परिसरातील शेतकऱ्यांना पिकाच्या सुधारित वाणांची माहिती मिळाली. तसेच कृषी विभागातर्फे पीक विम्याच्या संदर्भात आणि उत्पादकता वाढीसाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक बाबींवरही यावेळी चर्चा करण्यात आली.

# हिंजवडीतील शेतकरी हुलावळे कुटुंबाची पोलिस आयुक्तांकडे धाव

**जमीन प्रकरणी दबाव आणि खोट्या गुन्हात अडकवण्याची धमकी**

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीलगतच्या हिंजवडी परिसरात जमीन वादातून गंभीर स्वरूपाचे आरोप समोर आले आहेत. हुलावळे कुटुंबीयांनी काही व्यक्तींविरुद्ध न्यायालयीन प्रकरणे मागे घेण्यासाठी दबाव टाकणे, जमीन ताब्यात देण्यास भाग पाडणे, तसेच जीवे मारण्याच्या धमक्या देणे अशा गंभीर आरोपांसह खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करत थेट पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. फिर्यादी विशाल दत्तात्रय हुलावळे, विवेक अर्जुन हुलावळे व अर्जुन महतु हुलावळे (रा. हिंजवडी, ता. मुळशी) यांनी दिलेल्या निवेदनानुसार, त्यांच्या कुटुंबीयांच्या मालकीची हिंजवडी येथे गट क्र. ६० अशी शेतीजमीन असून, त्याबाबत दिवाणी न्यायालयात विविध दावे प्रलंबित आहेत. संबंधित जमीन प्रकरणी काही आरोपींनी खोटे व बेकायदेशीर कागदपत्रे तयार करून फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच चुकीची व दिशाभूल करणारी कागदपत्रे सादर करून न्यायालयात दावे दाखल करण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे. फिर्यादींच्या म्हणण्यानुसार, त्यांनी कधीही संपूर्ण जमीन ताब्यात देण्यास संमती दिलेली नसताना काही आरोपींनी ७/१२ उताऱ्यावर स्वतःच्या नावाची नोंद करून घेतली. या प्रकरणी संबंधित खरेदीखत रद्द करण्यासाठी दिवाणी न्यायालय तसेच महसूल न्यायालयात अपील प्रलंबित आहे. मे २०२५ मध्ये फिर्यादी घरात नसताना ३ ते ४ अज्ञात इसमांनी घरी जाऊन कुटुंबीयांना दमबाजी केल्याचा आरोप आहे. "जमिनींचा ताबा आम्ही लवकरच घेणार; आडवे आल्यास खोट्या गुन्ह्यात अडकवू," अशी धमकी देत पोलिसांशी 'सेटिंग' असल्याचे सांगण्यात आल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

तसेच या सातत्यपूर्ण दबावामुळे कै. दत्तात्रय म्हातु हुलावळे यांचा १० सप्टेंबर २०२४ रोजी मृत्यू झाला असून, कै. काळुराम म्हातु हुलावळे यांचाही संशयास्पद मृत्यू झाल्याचा आरोप फिर्यादींनी केला आहे. या दोन्ही मृत्यूंस संबंधित आरोपी जबाबदार असल्याचे सांगत त्यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी हि पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तांकडे करण्यात आली आहे. फिर्यादींच्या मते, संबंधित जमीन सध्या त्यांच्या प्रत्यक्ष ताब्यात असून तेथे बोअरवेल, वीजजोडणी, बांधकाम तसेच लिव्ह अँड लायसेन्स करारानुसार काही भाडेकरू वास्तव्यास आहेत. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असतानाही जबरदस्तीने ताबा घेण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पोलिसांकडे अविनाश गणपत पाटील, विजय विष्णू प्रसाद मर्दा, मयूर वसंतलाल शेठिया, श्रीपाद विमलचंद मेहता दत्तात्रय मारुती मोरे यांच्यावर यापूर्वी तक्रार करूनही योग्य ती कारवाई होत नसल्याने अखेर पोलिस आयुक्तांकडे लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे. संबंधित आरोपी आर्थिक व राजकीयदृष्ट्या प्रभावशाली असून पोलिसांवर दबाव टाकत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. दरम्यान, अहिल्यानगर येथील डॉक्टरांना कित्येक कोटींचा गंडा घालणाऱ्या विजय मर्दा वर फसवणुकीचे गुन्हे ही दाखल आहेत आणि त्या प्रकरणी त्यांना अटक ही झाली होती. अविनाश गणपत पाटील, विजय मर्दा ,मयूर वसंतलाल शेठिया, श्रीपाद विमलचंद मेहता दत्तात्रय मारुती मोरे अशा आरोपीस जीवे मारण्याची धमकी, फसवणूक, जबरदस्ती, तसेच मृत्यूस कारणीभूत ठरणे यासंदर्भात त्याच्यावर गंभीर गुन्हे दाखल करून सखोल चौकशी करावी आणि कठोर कारवाई करावी, आणि आम्हाला न्याय मिळावा अशी मागणी हिंजवडी येथील हुलावळे कुटुंबीयांनी केली आहे.